- वितरण -
नागपूर-अकोला-वाशिम-खामगाव-बुलढाणा-अमरावती-वर्धा-यवतमाळ-चंद्रपूर-गडचिरोली-भंडारा-गोंदिया

दैनिक
# सिंहवाणी वृत्त
प्रखर लेखणीचा साक्षीदार

संपादक (विकास) : श्याम पेठकर   संचालक-संपादक : अजय बिवडे

Reg. No : MHBIL/25/A4140 | Mail Id : sinhvanivrutta@gmail.com | दिनांक : गुरूवार, २३ जुलै २०२६ | Epaper : epaper.sinhvani.com | पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : २२४ | किंमत : २ रूपये

**सोने-चांदी**
- २४ कॅरेट : १,४८,७०० /-
- २३ कॅरेट : १,४६,३५० /-
- चांदी : २,३८,३००/-

विदर्भातील सर्व जिल्ह्यामध्ये प्रतिनिधी नेमणे आहे...
विदर्भातील सर्व जिल्ह्यांमध्ये शहर, ग्रामिण भागात प्रतिनिधी नेमणे आहे. अनुभवी व इच्छुक असलेल्यांनी संपर्क साधावा...
- दैनिक सिंहवाणी वृत्त -
९६५७२३२०२६, ८६९८७८८६६६

# जंतर-मंतरवर विद्यार्थी-पोलिसांत झटापट



**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**
बुधवारी रात्री दिल्लीतील जंतर मंतर येथे विद्यार्थी आणि पोलिसांमध्ये संघर्ष झाला. सीजेपीच्या आंदोलकांनी पोलिसांवर दगडफेक केली. प्रत्युत्तरादाखल पोलिसांनी अश्रुधुराच्या नळकांड्या फेकल्या.
या घटनेचे व्हीडीओ समोर आले असून, त्यामध्ये आंदोलक काठ्या घेऊन पोलिस अधिकाऱ्यांवर हल्ला करताना दिसत आहेत. यापूर्वी, २० जुलै रोजी सीजेपीच्या संसद मोर्चादरम्यान संघर्ष झाला होता. आंदोलक संसदेच्या प्रवेशद्वाराजवळ पोहोचले होते आणि त्यांना पांगवण्यासाठी लाठीचार्ज करण्यात आला होता. अभिजीत दीपके यांनी सोनम वांगचुक यांना उपोषण संपवण्याचे आवाहन केले. देशाला त्यांची गरज आहे, असे सांगून पक्षाचे शांततापूर्ण आंदोलन सुरूच राहील, असे आश्वासन दिले. केंद्र सरकारने दिल्लीत पश्चिम बंगालमधून २० अतिरिक्त सीआरपीएफ कंपन्या तैनात करण्याचे आदेश दिले आहेत.
गृह मंत्रालयाच्या निर्देशानुसार पश्चिम बंगालमधील कोलकाता येथून सुमारे २,००० जवानांना विमानाने आणण्यात आले. सुरक्षेच्या कारणास्तव दिल्लीतील सोळा मेट्रो स्थानके बंद करण्यात आली होती. मात्र, सायंकाळी सर्व स्थानके पुन्हा सुरू झाली. सीजेपीच्या आंदोलनादरम्यान आरएएफ जवानावर झालेल्या हल्ल्याप्रकरणी दिल्ली पोलिसांनी एफआयआर दाखल केला आहे. पोलिसांच्या म्हणण्यानुसार, व्हायरल झालेल्या व्हिडिओमध्ये काही आंदोलक आरएएफ जवानाला मारहाण करताना, आरएएफच्या वाहनावर दगडफेक करताना आणि त्याची तोडफोड करताना दिसत आहेत.
दिल्ली उच्च न्यायालयाने विद्यार्थ्यांवरील हल्ल्यासंदर्भातील एका याचिकेवर सुनावणी घेतली. उच्च न्यायालयाने सरकारला हल्ल्याचे सीसीटीव्ही फुटेज जतन करण्याचे निर्देश दिले.

## बिहार : मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानासमोर पेपरफुटीविरोधात आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांना पोलिसांनी पळवून मारले, फरफटत नेले, भाजप आमदार पळाल्याने वाचला

**वृत्तसंस्था, बिहार :** बिहारमध्ये मुख्यमंत्री निवासस्थानाबाहेर नीट पेपरफुटीविरोधात आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर पोलिसांनी लाठीचार्ज केला. पोलिसांनी त्यांचा पाठलाग करून त्यांना मारहाण केली. आंदोलनादरम्यान, अनेक विद्यार्थी रस्त्यावर झोपले, ज्यांना पोलिसांनी फरफटत नेले. त्यांना वाहनांमध्ये जबरदस्तीने बसवले. यापूर्वी, पोलिसांनी डाकबंगला चौकात विद्यार्थ्यांना बॅरिकेड्स लावून अडवले होते. सुमारे एक तासभर, विद्यार्थ्यांनी सरकारविरोधात घोषणाबाजी केली आणि बॅरिकेड्सवर चढले. पोलिसांनी त्यांना पांगून जाण्यास वारंवार सांगितले, पण त्यांनी नकार दिला. विद्यार्थ्यांना हटवण्यासाठी सीआयएसएफ आणि सीआरपीएफला पाचारण करण्यात आले. विद्यार्थ्यांनी बॅरिकेड्स तोडून राजभवनाच्या दिशेने कूच केले.







डाकबंगला चौकातून बाहेर पडणाऱ्या भाजप नेत्यांच्या वाहनांवरही आंदोलकांनी हल्ला केला. एका आमदाराला जीव वाचवण्यासाठी पळून जावे लागले. आंदोलनादरम्यान पाटणा पोलीस महानिरीक्षकांच्या सुरक्षा वाहनावर हल्ला झाला. आंदोलकांनी जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षक (एसपी) यांच्यासमोर टाळ्या वाजवल्या. यापूर्वी, पोलिसांनी विद्यार्थ्यांना जेपी गोलंबर येथे थांबवले होते, परंतु त्यांनी तेथील बॅरिकेड्स तोडून डाक बंगल्यापर्यंत मजल मारली. जेपी गोलंबर येथे विद्यार्थ्यांना थांबवण्यासाठी पोलिसांनी पाण्याचे फवारे, अश्रुधूर आणि लाठीचार्जचाही वापर केला. असे असूनही, त्यांनी रस्त्यावर बसून आंदोलन सुरूच ठेवले. विद्यार्थ्यांनी सकाळी गांधी मैदानावरून राजभवनाकडे मोर्चा काढला.

**सर्व प्रकारची प्रिंटींग अगदी कमी दरात...**
नागपूरातून अत्याधुनिक छपाई मशीनव्दारे कमी दरात सर्व प्रकारची प्रिंटींग करण्याची सुवर्णसंधी...
- आजच संपर्क करा -
८६९८७८८६६६
९६५७२३२०२६

**थोडक्यात**

## अनंतनागमध्ये दहशतवादी हल्ला

**अनंतनाग :** दक्षिण कश्मीरमधील अनंतनागमध्ये गस्त घालणाऱ्या पोलिसांवर बुधवारी दहशतवाद्यांनी हल्ला केला. या हल्ल्यात एक कॉन्स्टेबल गंभीर जखमी झाला. जखमी कॉन्स्टेबलला तात्काळ उपचारासाठी रुग्णालयात नेण्यात आले, तिथे उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. आशिक हुसेन कुरेशी असे शहिद कॉन्स्टेबलचे नाव आहे. या घटनेनंतर परिसरात सुरक्षा व्यवस्था कडक करण्यात आली आहे. कुरेशी हे अनंतनागच्या लाल चौक परिसरात कोकरनाग रस्त्यावर कर्तव्यावर होते. यादरम्यान एका वाहनातून आलेल्या दहशतवाद्यांनी कुरेशी यांना लक्ष्य करत त्यांच्यावर अंदाधुंद गोळीबार केला. या हल्ल्यात आशिक हुसेन घटनास्थळीच गंभीर जखमी होऊन कोसळले. हल्ल्यानंतर हल्लेखोर तात्काळ घटनास्थळावरून पळून गेले. सहकारी जवान आणि स्थानिकांच्या मदतीने त्यांना उपचारासाठी जवळच्या जीएमसी अनंतनाग रुग्णालयात दाखल करण्यात आले. दहशतवाद्यांच्या गंभीर जखमी झाल्याने रुग्णालयात उपचारादरम्यान कुरेशी यांचा मृत्यू झाला. शहीद हेड कॉन्स्टेबल आशिक हुसेन कुरेशी (बेल्ट क्र. २०, आयआर ३ बटालियन) हे बडगामच्या बिरू भागातील रहिवासी होते. पोलिस प्रशासनाकडून नियमांनुसार पुढील वैद्यकीय-कायदेशीर कार्यवाही केली जात आहे. हल्ल्याची माहिती मिळताच, अतिरिक्त पोलिस आणि लष्करी तुकड्या घटनास्थळी दाखल झाल्या.

# राज्यातील ५३३ शेतकऱ्यांची पहिली यादी जाहीर

**वृत्तसंस्था, मुंबई**
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा वाढदिवस आणि माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांची पहिली जयंती याचे औचित्य साधत राज्य सरकारने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेतील पात्र ५३३ शेतकऱ्यांची पहिली प्रातिनिधीक यादी जाहीर केली. मंत्रालयात आयोजित सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांनी याबाबतची घोषणा केली. राज्यातील ५६ लाख शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ मिळणार आहे. महात्मा फुले शेतकरी कर्जमाफीचा लाभ घेतलेल्या १२ लाख शेतकऱ्यांनाही २ लाखांपर्यंतच्या कर्जमाफीचा लाभ मिळणार आहे.



आजपर्यंतची सगळ्यात मोठी अशी ही ऐतिहासिक कर्जमाफी योजना असणार असल्याचे बाबासाहेब पाटील म्हणाले. कर्जमाफी योजनेसाठी ४० हजार ९८० कोटींची तरतूद करण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना जाहीर केली होती. त्यानंतर नुकत्यात पार पडलेल्या विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात ही योजना आणखीन विस्तारित करण्यात आली.
महात्मा फुले कर्जमाफी योजनेचा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांचाही समावेश यात करण्यात आला. आता बुधवारी अधिकृतरित्या प्रातिनिधीक स्वरूपात सात जिल्ह्यातील निवडक ५३३ पात्र लाभार्थ्यांची यादी प्रसिध्द करण्यात आली. लाभार्थी शेतकऱ्यांची यादी आणि लाभ वितरणाची प्रक्रिया अत्यंत पारदर्शक करण्यात आली आहे. ही योजना केवळ कर्जमुक्ती नसून शेतकऱ्यांवरील आर्थिक ताण कमी करुन त्यांना नव्या जोमाने शेती करता यावी यासाठी आमचा हा प्रामाणिक प्रयत्न आहे. यापूर्वी कर्जमाफी झाल्यास शेतकऱ्याला कर्ज मिळत नव्हते.
आता कर्जमाफी झाल्यानंतर त्या शेतकऱ्यांना कर्ज दिले पाहिजे अशी कायदेशीर तरतूद करण्यात आली असल्याचेही बाबासाहेब पाटील म्हणाले. शेतीबाहय उत्पन्नावर आयकर भरणाऱ्या शेतकऱ्यांना याचा लाभ मिळणार नाही. त्याबाबत केंद्र सरकारशी सातत्याने संपर्क सुरू असून त्यासाठी खास अधिकारीही नेमण्यात आला आहे. ही आकडेवारी आल्यानंतर एकदोन दिवसांत संपूर्ण यादी प्रसिदध करण्याचा सरकारचा प्रयत्न असणार आहे. यादी प्रसिदध झाल्यानंतर काही आक्षेप असल्यास जिल्हास्तरावरील समितीकडे अपील करता येईल.
तिथे समाधान न झाल्यास राज्य स्तरावर त्याचे निराकरण करण्यात येणार आहे. २ लाखापेक्षा ज्या शेतकऱ्यांची रक्कम जास्त आहे. त्यांना वरची रक्कम ३१ मार्च २०२७ पर्यंत भरावी लागणार आहे. त्यानंतर त्यांना २ लाखापर्यंतच्या रकमेचा लाभ मिळणार आहे.

### कशी होणार प्रक्रिया ?

यादीतील लाभार्थ्यांना त्यांच्या मोबाईलवर आधार प्रमाणिकरण करण्याबाबत एसएमएस पाठविण्यात येणार आहे. तसेच सदरच्या याद्या गावपातळीवर ग्रामपंचायत, विविध कार्यकारी सहकारी संस्था कार्यालय तसेच संबंधित बँकेच्या शाखेत प्रसिध्द करण्यात येणार आहे. सदर यादीमध्ये पात्र शेतकऱ्यांना एक विशिष्ट क्रमांक देण्यात येणार आहे.
शेतकऱ्यांना त्याचे आधार क्रमांक किंवा विशिष्ट क्रमांकाच्या आधारे आधार प्रमाणिकरण करणे आवश्यक आहे. राज्यात सध्या कार्यरत असलेल्या सुमारे ३२ हजार आपले सरकार सेवा केंद्रातून पात्र लाभार्थ्यांनी आधार प्रमाणिकरण करण्याची सुविधा उपलब्ध केली आहे. याप्रमाणे आधार प्रमाणिकरण करणेपूर्वी शेतकऱ्यांची ॲग्रीस्टॅक वरील नोंदणी आवश्यक आहे. आधार प्रमाणिकरण झाल्यानंतर संबंधित लाभार्थ्यांच्या कर्जखात्यावर लाभाची रक्कम डीबीटीव्दारे हस्तांतरित करण्यात येणार आहे.

# तर उपोषण मागे घेऊ, सोनम वांगचुक यांचे केंद्र सरकारला पत्र

**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**
राजधानी दिल्लीत गेल्या २० दिवसांपेक्षा जास्त कालावधीपासून सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांचे उपोषण सुरू आहे. नीट पेपरफुटीप्रकरणात जबाबदारी स्वीकारत धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावी, अशी मागणी सोनम वांगचुक यांच्यासह कॉक्रोच जनता पक्षाच्या अभिजीत दीपके यांनी केली आहे. या मागणीसह सोनम वांगचुक दिल्लीतील जंतर मंतर मैदानावर उपोषणाला बसले होते, मात्र न्यायालयाने त्यांच्या प्रकृतीला प्राधान्य देण्याचे निर्देश सरकारला दिल्यानंतर, दिल्ली पोलिसांनी त्यांना जबरदस्तीने थेट रुग्णालयात दाखल केले.
आता, सरकारने त्यांच्यासोबत चचेर्ला सुरुवात केली आहे. त्याच पार्श्वभूमीवर सोनम वांगचुक यांनी तीन अटींवर उपोषण सोडण्यास तयार असल्याचं पत्र केंद्र सरकारला लिहिलं आहे.
सोनम वांगचुक यांनी केंद्रीय मंत्री जे.पी. नड्डा आणि डॉ. जितेंद्र सिंह यांना लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे की, सरकारने नीट पेपरफुटीनंतर आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबीयांना पर्याप्त नुकसानभरपाई द्यावी आणि शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याबाबत संसदेत अर्थपूर्ण चर्चा व्हावी. तसेच, २० जुलै रोजी झालेल्या चलो संसद मार्चमध्ये विद्यार्थ्यांनी मोठ्या संयमाने शांततापूर्ण आंदोलन केले. पोलिसांकडून झालेल्या अतिरेकी कारवाई असूनही विद्यार्थ्यांनी लोकशाही मागार्ने आपली मागणी मांडली. या आंदोलनात सहभागी झालेल्या कोणत्याही तरुणांवर खटले किंवा दडपशाही न करता त्यांना संरक्षण द्यावे, अशी मागणी सोनम वांगचुक यांनी केली आहे.

# जेनेरिक औषधांवर २०० टक्के टॅरिफ

**वृत्तसंस्था, वॉशिंग्टन**
अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी देशांतर्गत औषध निर्मितीला चालना देण्यासाठी आणि परदेशी कंपन्यांवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी एक मोठा निर्णय घेतला आहे. अमेरिकेत आयात केल्या जाणाऱ्या जेनेरिक औषधांवर टप्प्याटप्प्याने तब्बल २०० टक्क्यांपर्यंत आयात शुल्क अर्थात टॅरिफ लादण्याची घोषणा ट्रम्प यांनी केली आहे. अमेरिकेच्या या निर्णयामुळे जगातील औषध निर्यातदार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या हिंदुस्थानच्या औषध उद्योगाला मोठा फटका बसण्याची शक्यता वर्तवली जात आहे.
१ ऑगस्ट २०२६ पासून हे नवीन धोरण लागू केले जाईल. पहिले दोन वर्षे (२०२६-२०२८) अमेरिकेत आयात होणाऱ्या सर्व जेनेरिक औषधांवर शून्य टक्के शुल्क राहील. तिसऱ्या वर्षी (२०२८-२९) जेनेरिक औषधांवरील आयात शुल्क थेट १०० टक्के केले जाईल, तर चौथ्या वर्षी (२०२९ नंतर) हे शुल्क वाढवून २०० टक्के केले जाईल, अशी माहिती डोनाल्ड ट्रम्प यांनी ट्रूथ सोशल या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर एक पोस्ट शेअर करत दिली. अमेरिकेत जेनेरिक औषधांचे उत्पादन पुन्हा सुरू व्हावे, हाच या धोरणाचा मुख्य उद्देश आहे. ज्या कंपन्या दिलेल्या मुदतीत अमेरिकेत आपले प्रकल्प आणि यंत्रसामग्री उभारणार नाहीत, त्यांना हा दंड सहन करावा लागेल. अमेरिकन जनतेच्या हिताचे रक्षण करण्यासाठीच हा निर्णय घेण्यात आला आहे. मात्र, पेटंट असलेल्या, ब्रँडेड किंवा नवनवीन औषधांवरील सध्याचे यशस्वी धोरण जसे आहे तसेच राहील, असेही ट्रम्प यांनी स्पष्ट केले.

### भारतावर काय परिणाम होणार ?

भारतीय औषध उद्योगासाठी अमेरिका ही सर्वात मोठी बाजारपेठ आहे. ट्रम्प यांच्या या निर्णयामुळे भारतीय कंपन्यांसमोर मोठे आव्हान उभे ठाकले आहे. अमेरिकेत वापरल्या जाणाऱ्या एकूण जेनेरिक औषधांपैकी सुमारे ४० टक्के औषधे एकट्या हिंदुस्थानातून पुरवली जातात. ग्लोबल ट्रेड रिसर्च इनिशिएटिव्हच्या अहवालानुसार, आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये हिंदुस्थानने अमेरिकेला ९.७ अब्ज डॉलर (सुमारे ८० हजार कोटी रुपये) मूल्याच्या औषधांची निर्यात केली होती. भारताच्या एकूण औषध नियार्तीत (२५.८ अब्ज डॉलर) अमेरिकेचा वाटा तब्बल ३८ टक्के आहे. अमेरिकेत उच्च रक्तदाब, मधुमेह, कर्करोग, नैराश्य, संसर्गजन्य आजार आणि मानसिक आरोग्यासाठी भारत जेनेरिक औषधांचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो. फायनान्शियल पोस्टच्या अहवालानुसार, २०२४ मध्ये अमेरिकेत वापरल्या जाणाऱ्या एकूण गर्भनिरोधक गोळ्यांपैकी तब्बल ६५ टक्के पुरवठा ग्लेनमार्क फार्मास्युटिकल्स आणि लुपिन या अव्वल दोन भारतीय कंपन्यांकडून केला जात होता.

### करारात सवलत मिळण्याचे संकेत

फेब्रुवारी महिन्यात झालेल्या व्यापार करारानुसार अमेरिकेने जेनेरिक औषधे आणि घटकांबाबत भारताला वाटाघाटीद्वारे सवलत मिळण्याचे संकेत देण्यात आले होते. मात्र, ट्रम्प यांच्या ताज्या घोषणेमुळे या कराराच्या अंमलबजावणीवर आणि भारतीय औषध कंपन्यांच्या भविष्यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. आयात शुल्कातून वाचण्यासाठी भारतीय औषध निर्मात्यांना आता अमेरिकेतच आपले उत्पादन प्रकल्प उभारावे लागतील किंवा अमेरिकन बाजारातील औषधांच्या किमती प्रचंड वाढवाव्या लागतील. यामुळे थेट अमेरिकन ग्राहकांच्या खिशावरही ताण पडू शकतो.

# विद्यार्थ्यांवरील अमानुष लाठीचार्ज, आक्रमक काँग्रेसचे मुंबईत जोरदार आंदोलन

**वृत्तसंस्था, मुंबई**
नीट सह अनेक परिक्षामधील गोंधळामुळे देशातील लाखो विद्यार्थ्यांचे भवितव्य अंधकारमय झाले आहे. संतप्त विद्यार्थी उतरून शांततामय मागार्ने आंदोलन करत असताना त्यांच्यावर मोदी-शाह यांच्या पोलिसांनी केलेला अमानुष लाठीहल्ला केला. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी, सरचिटणीस प्रियंका गांधी व काँग्रेस खासदार यांना अमानुष वागणूक दिली.
या विरोधात काँग्रेसने आज आक्रमक भूमिका घेत भाजप विरोधात आंदोलन केले. काँग्रेसच्या गांधी भवनापासून भाजप कार्यालयावर धडक मोर्चाचे आयोजन केले होते. भाजपाच्या कार्यालयात जाऊन त्यांना संविधान भेट देण्याची काँग्रेसची भूमिका होती पण



पोलिसांनी काँग्रेस नेते व पदाधिकाऱ्यांना रिगल सिनेमाजवळ ताब्यात घेतले. मोदी हटाव, देश बचाव, जब जब मोदी डरता है, पुलिस को आगे करता है, या घोषणा यावेळी देण्यात आल्या.
काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या नेतृत्वाखाली निघालेल्या मोर्चात विधिमंडळ पक्षनेते विजय वडेट्टीवार, काँग्रेस वर्किंग कमिटीचे सदस्य माजी मंत्री नसीम खान, आमदार भाई जगताप, माजी खासदार भालचंद्र मुणगेकर, माजी खासदार हुसेन दलवाई, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तुषार गांधी, प्रदेश सरचिटणीस राजन भोसले, प्रकाश सोनावणे, अभिजीत सपकाळ, अमित कारंडे, राणी अग्रवाल, झिशान अहमद, ब्रिज दत्त, आनंद सिंग यांच्यासह शेकडो पदाधिकारी उपस्थित होते. आंदोलनापूर्वी गांधी भवन मध्ये झालेल्या पत्रकार परिषदेला संबोधित करताना प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, मागील १२ वर्षापासून देशात लोकशाही व संवैधानिक मुल्ये बासनात गुंडाळून ठेवली आहेत.
दरवर्षी २ कोटी रोजगार देण्याचे स्वप्न दाखवून नरेंद्र मोदी यांनी तरुणांची घोर फसवणूक केली आहे. रोजगार तर दूर राहिले आज परीक्षाही व्यवस्थित घेतल्या जात नाहीत. परीक्षा पद्धतीत सुधारणा करावी व पेपरफुटीवर संसदेत चर्चा करावी अशी मागणी विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी संसदेत केली होती पण मोदी सरकारने त्याकडे दुर्लक्ष केले. नीटचा पेपर हा काही यावर्षीच फुटला असे नाही तर तब्बल ७१ वेळा पेपर फुटला आहे. मोदी सरकारच्या विरोधात काँग्रेस पक्ष व राहुल गांधी यांनी छात्रों की गुंज हे अभियान हाती घेऊन विद्यार्थ्यांना न्याय देण्यासाठी लढा पुकारला आहे. दिल्लीत हजारो विद्यार्थी एकत्र आले असून मोदी सरकारविरोधात आक्रोश व्यक्त करत आहेत.

संपादकीय लेखणीतून...

## ज्याचा मेंदू बिघडला, तो वेडा झालाच ?

सन २०१४मध्ये प्रथमच २२ जुलै रोजी जागतिक मेंदू दिन साजरा करण्यात आला. मेंदू हा मानवी शरीराचा सर्वात महत्वाचा भाग आहे. शरीरातील सर्वप्राण्यांच्या शरीरातील एक गुंतागुंतीचा अवयव कामांवर नियंत्रण ठेवण्याबरोबरच विचार करणे, निर्णय घेणे, लक्षात ठेवणे आणि आठवण करणे यासारख्या महत्त्वाच्या कार्यांसाठी ते जबाबदार असते. दि.२२ जुलै रोजी जागतिक मेंदू दिन साजरा केला जातो. हा दिवस साजरा करण्यामागचा उद्देश हा आहे, की लोकांना मेंदूशी संबंधित सर्व आजारांची माहिती व्हावी. जागतिक मेंदू दिन दरवर्षी साजरा केला जातो. मेंदूशी संबंधित सर्व आजारांबद्दल लोकांना जागरूक करणे, हा या दिवसाचा उद्देश आहे. हा दिवस पहिल्यांदा सन २०१४मध्ये साजरा करण्यात आला. दरवर्षी या दिवसासाठी वेगळी थीम ठरवली जाते आणि मेंदूशी संबंधित आजारांबाबत लोकांना जागरूक करण्यासाठी या दिवशी विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. जागतिक मेंदू दिनाचा इतिहास असा की, सन २०१३मध्ये वर्ल्ड कॉंग्रेस ऑफ न्यूरोलॉजीच्या सार्वजनिक जागरुकता आणि वकिल समितीने जगभरात मेंदूच्या समस्यांची वाढती संख्या लक्षात घेऊन जागतिक मेंदू दिन साजरा करण्याचा प्रस्ताव दिला. यानंतर वर्ल्ड फेडरेशन ऑफ न्यूरोलॉजी आणि इंटरनॅशनल हेडके सोसायटीतर्फे प्रथमच जागतिक मेंदू दिन साजरा करण्यात आला. त्या वर्षीची थीम होती एपिलेप्सी.

**मेंदू निरोगी ठेवण्याचे उपाय–** प्रतिकारशक्ती मजबूत ठेवणे, मेंदूला निरोगी ठेवण्यासाठी रोगप्रतिकारशक्ती मजबूत ठेवणे गरजेचे आहे, जेणेकरून आपले शरीर पुन्हा पुन्हा आजारी पडणार नाही. खरं तर, जेव्हा आपण वारंवार शारीरिक आजारी पडतो, तेव्हा आपल्या मनावरही त्याचा परिणाम होतो. अशा परिस्थितीत मेंदूची कार्यक्षमता आणि उत्पादकता प्रभावित होते. त्यामुळे शरीर निरोगी ठेवण्यासाठी आहारात निरोगी जीवनशैली आणि अन्नाचा समावेश करावा. योगासने आणि ध्यान नियमितपणे करावे, मन निरोगी ठेवण्यासाठी ते तणावमुक्त ठेवणे महत्त्वाचे आहे. यासाठी नियमितपणे योगासने आणि ध्यान करावे. योग आपल्या शरीराला तंदुरुस्त ठेवण्यास मदत करेल, तर ध्यान मनातील गोंधळ शांत करेल. त्यासोबत फिरता येते. पुरेशी झोप घ्यावी, झोपेच्या कमतरतेचा आपल्या मेंदूवरही परिणाम होतो. त्यामुळे आपली झोप रुटीन करावी आणि आठ तासांची झोप नियमित घ्यावी. हे पदार्थ टाळावेत, अन्नाचा आपल्या मेंदूवरही परिणाम होतो. अशा परिस्थितीत दारू, सिगारेट, तंबाखू, फास्ट फूड, जंक फूड इत्यादीपासून दूर रहावे. अक्रोड, बदाम, फ्लेक्ससीड्स, भोपळ्याच्या बिया इत्यादींना आपल्या आहाराचा भाग बनवावा.

**मानवी मेंदूत मज्जासंस्थेचा विकास–** सहा आठवडे वयाच्या गभार्चा मेंदू एक गुंतागुंतीच्या व क्रमबद्ध पायऱ्यांनी विकसित होतो. हे आकार बदलते मज्जासंस्थेच्या अगदी सुरुवातीस प्रारंभिक भ्रूणीय अवस्थांमधील एक साध्या सूजाने. क्षेत्र आणि कनेक्शनच्या जटिल सरचा न्यूरॉन्स स्टेम पेशी असलेल्या विशेष क्षेत्रामध्ये बनविल्या जातात आणि नंतर त्यांच्या अंतिम स्थानांवर पोहचण्यासाठी ऊतकांमधून स्थलांतर करतात. एकदा न्यूरॉन्स स्वतःवर स्थायिक झाल्यानंतर त्यांचे आकुंचने उडू शकते आणि मस्तिष्क, शाखाप्रमाणे आणि ते जाताना विस्तारत असतात. जोपर्यंत टिपा त्यांच्या लक्ष्यांवर पोहोचत नाहीत आणि ज्यातून सिंकॅप्टिक कनेक्शन बनतात. मज्जासंस्थेच्या अनेक भागांमध्ये सुरुवातीच्या अवस्थेत न्यूरॉन्स आणि सिन्प्सेसचे जास्त प्रमाणात उत्पादन केले जाते आणि नंतर अनावश्यक वस्तू काढून टाकल्या जातात. व्हर्टिब्रेट्ससाठी मज्जासंस्थेच्या विकासाच्या पहिल्या टप्प्यात सर्व प्रजातींमध्ये समान असतात. जसे की भ्रूण कोबळेच्या एका गोल धड्यात एक व्हर्मक्लाइक्स संरचना बनतात. त्याप्रमाणे पाठीच्या मध्यभागावर चालणाऱ्या क्टोडर्मची संकुचित पट्टी न्यूरल प्लेट बनण्यास प्रेरित करते, ही नर्व्हस सिस्टमची नांदी होय. मज्जासंस्थेच्या प्लेटमध्ये मज्जासंस्थेच्या खोबणीसाठी अंतराळ होते आणि नंतर ओठ असलेल्या ओठ मज्जासंस्थेच्या नलिकेला जोडण्यासाठी विलीन होतात.

केंद्रांमध्ये द्रव-भरलेले व्हेट्रिकल असलेल्या पेशींचे एक खोबरे दात समोरच्या बाजूस व्हेट्रिकल्स आणि तीन फुटी दोरखंड तयार करण्यास प्रवृत्त होते. त्यात अग्रमहामंडळ, मध्यांतर आणि हिंदकबळीचा पूर्वकाल असतो. पुढच्या टप्प्यावर अग्रमस्त्री टेलिसेफेलन नावाच्या दोन पेशी ज्यामध्ये सेरेब्रल कॉर्टेक्स, बेसल गॅन्गिलया आणि संबंधित स्ट्रक्चर असतात. डीनेसफेलन ज्यात थैमास आणि हायपोथालेमस असतात. त्याचवेळी मेन्टेन्फेलॉनमध्ये मेंदूचा पेशी आणि पानांचा समावेश असतो. आणि मायलेंसेफेलन ज्यामध्ये मेरुंडला ओब्लागेटा असेल त्यात अंतराची अवस्था येते. या प्रत्येक भागात ज्यात प्रजननक्षमता झोन आहेत, जिथे न्यूरॉन्स आणि ग्लियाल पेशी निर्माण होतात; परिणामी सेल नंतर स्थलांतर करतात, कधीकधी लांब अंतरासाठी त्यांच्या अंतिम स्थानांवर. न्यूरॉन एकदा अस्तित्वात असेल तर ते त्याच्या आजूबाजूच्या परिसरात डेंड्राइट्स आणि अशन्सऑनचे विस्तार करते.

# मुलगी झाली म्हणून छळः आधुनिकतेच्या बुरख्याआड दडलेली समाजमनाची विकृती

प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल
वर्धा

वाढता सामाजिक विकास, स्त्री-पुरुष समानतेच्या गप्पा, कायद्याचे वाढते हात आणि आधुनिकतेचा आव आणणाऱ्या आपल्या २१ व्या शतकातील तथाकथित प्रगत समाजात आजही हुंडा, छळ, सरंजामशाही मानसिकता आणि स्त्रीभ्रूण हत्येच्या आधुनिक रूपाचे बळी जात आहेत. मुलीचा जन्म झाल्याच्या कारणावरून कोल्हापूरमधील पेठवडगाव परिसरातील एका महिन्याच्या चिमुकलीची आई, अस्मिता प्रतीकसिंह काटकर या विवाहितेने सासरच्या अमानुष जाचाला कंटाळून गळफास लावून आपली जीवनयात्रा संपवली. या एका हृदयद्रावक घटनेने संपूर्ण महाराष्ट्र पुन्हा एकदा हादरला आहे. परंतु, ही केवळ एक प्रातिनिधिक घटना नाही, तर यामागची राष्ट्रीय आणि राज्य पातळीवरील अधिकृत आकडेवारी पाहिली, तर डोळ्यात झणझणीत अंजन घालणारे आणि समाज म्हणून आपली मान शरमेने खाली घालायला लावणारे दाहक वास्तव समोर येते. अस्मिताच्या आत्महत्येनंतर तिच्या माहेरच्या लोकांनी आणि विशेषतः तिच्या आईने सासरच्या मंडळींवर केलेले आरोप अत्यंत धक्कादायक आणि मानवी मूल्यांना काळिमा फासणारे आहेत. आज आपण डिजिटल युगात जगत असतानाही, त्या घरात अत्यंत प्रतिगामी, मध्ययुगीन आणि हुकूमशाही पद्धतीची वागणूक अस्मिताला दिली जात होती.

मुलीचा जन्म हाच गुन्हा मुख्यत्वे ठरला. सासरच्या लोकांनी घरात मुलगा जन्माला येईल या अपेक्षेने आणि आनंदाने आधीच मुलाच्या कपड्यांची खरेदी! केली होती. मात्र, निसर्गाच्या नियमानुसार अस्मिताने एका सुंदर मुलीला जन्म दिला. मुलगी झाली हा सासरच्या लोकांचा एवढा मोठा अपेक्षाभंग ठरला की, त्यांनी तेव्हापासूनच तिचा मानसिक छळ करायला आणि सतत टोमणे मारायला सुरुवात केली.

नवजात बाळासाठी सासरच्या लोकांनी ५२ हजार रुपयांचा महागडा पाळणा मागितला होता. अस्मिताच्या आईने अत्यंत हलाखीतूनही ४० हजार रुपये दिले होते आणि उर्वरित १२ हजार रुपये बारशाच्या दिवशी देण्याचे कबूल केले होते. परंतु, केवळ त्या काही हजार रुपयांसाठी आणि पैशांच्या हव्यासापोटी तिचा दररोज छळ केला गेला. एका आईचे 'माझ्या मुलीसाठी ५२ हजारांचा पाळणा मागितला होता...',हे हताश वाक्य आजच्या समाजातील पैशांच्या हव्यासावर तीव्र प्रहार करते. अस्मिताला डोक्यावरचा पदर कधीही ढळू न देण्याची कडक सक्ती होती. इतकेच नव्हे तर सासूला 'मांसाहेब', नणंदेला 'राणीसाहेब', सासऱ्याला 'आबासाहेब' आणि स्वतःच्या पतीला 'सरकार' म्हणूनच हाक मारण्याचे जुलमी बंधन तिच्यावर होते. घरात वावरताना जणू काही ती सून नसून एखाद्या जुन्या जहागीरदाराची गुलाम आहे, अशी वागणूक तिला दिली जात होती. नवा सरंजामशाही छळ सुरू होता.

लग्नात तिने सासरच्या म्हणण्यानुसार डान्स केला नाही, या एका क्षुल्लक कारणावरूनही तिची सासू तिची 'अस्मिता', स्वाभिमान सतत दुखवत होती आणि टोचून बोलत होती. सध्या या प्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून पती, सासू, सासरे आणि नणंद पोलीस कस्टडीत आहेत.

अस्मिताच्या प्रकरणात समोर आलेली कारणे आणि तिचे वकील असलेल्या आईचे अनुभव पाहिल्यावर आजच्या कौटुंबिक आणि न्यायालयीन वास्तवातील एक भीषण सत्य समोर येते. आज समाजात अत्यंत पोरकट, हास्यास्पद आणि क्षुल्लक कारणांवरून मुलींचे संसार मोडले जात आहेत किंवा त्यांना मृत्यूच्या दारात ढकलले जात आहे.

'माझ्या बहिणीसोबत त्या दिवशी गाडीत बसल्यावर तू बोलली नाहीस", "माज्या आईकडे तू रागानेच बघितले', किंवा 'माझ्या मावशीच्या मावस सासूच्या मामाच्या मुलाच्या लग्नात तुला गाणे म्हणायला सांगितले होते, तू म्हटले का नाही?' असल्या अत्यंत फालतू कारणांवरून थेट घटस्फोटाची भाषा केली जाते.

मुलींना माहेरी आणून सोडणारे आणि 'आम्हाला काय, दुसरी मुलगी सहज मिळेल', अशा पुरुषी अहंकाराच्या आणि पैशाच्या गर्वात वागणारे टोणगे आणि त्यांचे पाठीराखे आई-बाप आज समाजात उजळ माथ्याने फिरत आहेत. दुसरीकडे, 'मुलीचे लग्न लावून दिले की ती सासरची झाली.' आणि 'तिथून तिची फक्त प्रेतच बाहेर पडले पाहिजे' या जुनाट मानसिकतेमुळे तसेच 'समाजात आमचे नाक कापले जाईल.' या भीतीने मुलींचे आई-बाप सर्व छळ मुकाट्याने सहन करतात. पालकांची हीच हतबलता अशा दुर्दैवी आत्महत्यांना खतपाणी घालते.

**देशातील आणि महाराष्ट्रातील आत्महत्येची दाहक आकडेवारीः**

अस्मितासारख्या हजारो सुशिक्षित आणि गुणवान महिला दरवर्षी या मानसिक कोंडमारा, हुंडा आणि कौटुंबिक छळाला बळी पडत आहेत. नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरोची अधिकृत आकडेवारी या सामाजिक रोगाची भीषणता आकडेवारीसह स्पष्ट करते.

**राष्ट्रीय पातळीवरील धक्कादायक वास्तवः**

कौटुंबिक कलहः देशात दरवर्षी ५४,६५३ हून अधिक लोक केवळ कौटुंबिक वादाला आणि रोजच्या भांडणांना कंटाळून आपला जीव देतात. भारतातील एकूण आत्महत्यांपैकी सर्वाधिक प्रमाण कौटुंबिक कारणांचे आहे.

**विवाह आणि नातेसंबंधः** केवळ लग्न आणि नातेसंबंधातील समस्यांमुळे ज्यात हुंडा आणि छळाचा समावेश आहे, वर्षभरात १७,०५७ हून अधिक आत्महत्या होतात.

**गृहिणींचा टक्का सर्वाधिकः** भारतात दरवर्षी २१,००० ते २४,००० गृहिणी आत्महत्या करतात. याचाच अर्थ, दररोज सरासरी ६० गृहिणी घरातल्या त्रासाला कंटाळून आयुष्य संपवतात. हा आकडा कोणत्याही युद्ध किंवा अपघातापेक्षा भयंकर आहे.

**कलम ४९८-अ अंतर्गत गुन्हेः** पती आणि सासरच्या नातेवाईकांकडून होणाऱ्या छळाविरोधात (४९८-अ) दरवर्षी देशात १ लाखापेक्षा जास्त गुन्हे अधिकृतपणे नोंदवले जातात.

**महाराष्ट्राची अत्यंत चिंताजनक आणि गंभीर स्थितीः**

**महाराष्ट्र देशात अव्वलः** अत्यंत दुर्दैवाने, आत्महत्यांच्या एकूण संख्येत महाराष्ट्र हे संपूर्ण देशात पहिल्या क्रमांकावर आहे. देशातील एकूण आत्महत्यांपैकी जवळपास १३.५% आत्महत्या एकट्या महाराष्ट्रात होतात. राज्यात वर्षाला २२,६०० हून अधिक आत्महत्यांची नोंद होते म्हणजेच दररोज सरासरी ६० ते ६२ व्यक्ती जीवनयात्रा संपवतात.

**राज्यातील गृहिणींचे बळीः** गृहिणींच्या आत्महत्यांच्या बाबतीत महाराष्ट्र देशात पहिल्या तीन राज्यांमध्ये येतो. महाराष्ट्रात दरवर्षी २,८०० ते ३,००० गृहिणी सासरचा छळ, घरगुती हिंसाचार आणि मानसिक त्रासामुळे आत्महत्या करतात. याचाच अर्थ, राज्यात दररोज ८ गृहिणी आपले आयुष्य संपवत आहेत.

**नोंद झालेले गुन्हेः** महाराष्ट्रात ४९८-अ (सासरचा छळ) अंतर्गत दरवर्षी ९,००० हून अधिक गुन्हे दाखल होतात. ही आकडेवारी केवळ पोलीस ठाण्यांपर्यंत पोहोचलेल्या प्रकरणांची आहे, प्रत्यक्षात छळ सोसणाऱ्या महिलांची संख्या यापेक्षा कितीतरी पटीने जास्त असू शकते.

**वैचारिक मंथन आणि समाजमनाचा उरलेला विवेकः**

या संपूर्ण प्रकरणात सर्वात जास्त मन हेलावून टाकणारी गोष्ट म्हणजे, अवघ्या एक महिन्याची निष्पाप चिमुकली तिच्या जन्माच्या पहिल्याच महिन्यात आईच्या मायेला आणि दुधाला अंतरली आहे. त्या माऊलीने गळफास घेताना आपल्या एका महिन्याच्या बाळाचा विचार केला असेल, पण सासरकडून दिला जाणारा मानसिक आणि शारीरिक छळ तिच्या सहनशीलतेच्या पलीकडे गेला होता.

येथे मुलींच्या पालकांच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह उभे राहते. जेव्हा घरामध्ये असे टोकाचे वितंड वाद, छळ आणि हुकूमशाही सुरू असते, तेव्हा मुलीच्या आई-वडिलांना मुलगी गेल्यानंतरच बोलण्यासाठी कंठ फुटतो. जेव्हा छळ सुरू होता, तेव्हाच मुलीला माहेरी आणायला हवे होते. मागची पार्श्वभूमी माहिती असून देखील माहेरच्या लोकांनी, बाळंतपण झाल्यावर तिला अशा नरकात पाठवायला नको होते. 'लोक काय म्हणतील?' हा समाज नावाचा खोटा मुखवटा आपल्या पोटच्या गोळ्यापेक्षा मोठा अजिबात असू शकत नाही. तसेच, नवविवाहित जोडप्यांनी आणि पालकांनी हे समजून घेतले पाहिजे की, जर संसारात सुरुवातीपासूनच तीव्र वाद आणि कौटुंबिक हिंसाचार असेल, तर अशा वातावरणात मूल जन्माला घालण्याचा विचार त्वरित थांबवला पाहिजे. कारण वाद पेटल्यानंतर निष्पाप लहान मुले अनाथ होतात आणि त्यांचे आयुष्य उद्ध्वस्त होते.

कोल्हापूरच्या घटनेतही हेच समोर आले आहे की, मुलाच्या आशेने कपडे खरेदी करून बसलेल्या सासरच्या मंडळींचा, मुलगी झाल्यावर इतका अपेक्षाभंग झाला की त्यांनी एका महिन्याच्या बाळंतिणीला आत्महत्येच्या दारात ढकलले. 'मुलगी नको' ही मानसिकता केवळ अशिक्षित वर्गातच नाही, तर उच्चशिक्षित आणि गर्भश्रीमंत कुटुंबांमध्येही एका संसर्गजन्य रोगासारखी पसरलेली दिसते. विज्ञानाने हे सिद्ध केले आहे की, जन्माला येणारे बाळ मुलगा असणार की मुलगी, हे पूर्णपणे पुरुषाच्या गुणसूत्रांवर अवलंबून असते. स्त्रीकडे फक्त गुणसूत्रे असतात. त्यामुळे मुलगी होण्यात स्त्रीचा कोणताही वाटा किंवा दोष नसतो. असे असतानाही, केवळ अज्ञानामुळे किंवा जाणीवपूर्वक पुरुषी अहंकारातून मुलगी झाल्याचा सर्व दोष सुनेवर मढवला जातो. तिचे जीणे असह्य केले जाते, तिला अपशकुनी ठरवले जाते आणि सतत टोमणे मारून तिचा मानसिक कोंडमारा केला जातो.

मुलगी नको असण्यामागे आपल्या समाजातील बरेच मानसिक आजार कारणीभूत आहेत,मुलगाच वंशाचा दिवा असतो आणि तोच म्हातारपणी सांभाळेल, हा अत्यंत चुकीचा आणि कालबाह्य झालेला समज. आजच्या काळात मुली आपल्या आई-वडिलांचा सांभाळ मुलांपेक्षाही जास्त आस्थेने करत आहेत, हे शेकडो उदाहरणांवरून स्पष्ट होते. मुलगी झाली की तिच्या लग्नाचा खर्च, हुंडा द्यावा लागेल ही भीती आणि सासरच्या बाजूने 'मुलाच्या जन्माचे' निमित्त साधून माहेर कडून मोठी रक्कम किंवा वस्तू उपटण्याची असलेली हाव. नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरो च्या अहवालानुसार, भारतात होणाऱ्या कौटुंबिक छळामध्ये आणि हुंडाबळींमध्ये 'मुलगी होणे' हे एक छुपे पण अत्यंत प्रमुख कारण आहे. पहिल्यांदा मुलगी झाल्यावर दुसऱ्यांदा मुलगाच झाला पाहिजे म्हणून सक्ती करणे.गर्भलिंग निदान चाचणीसाठी, जी कायद्याने गुन्हा आहे. सुनेवर दबाव आणणे. बाळंतिणीला आणि तिच्या नवजात मुलीला पोषक आहार न देणे, वैद्यकीय सुविधा नाकारणे आणि माहेरी पाठवून देणे. महाराष्ट्रात दरवर्षी जवळपास ३,००० गृहिणी घरगुती हिंसाचाराला कंटाळून आत्महत्या करतात, ज्यातील अनेकांच्या छळाची सुरुवात ही कन्यारत्नाच्या जन्मानंतर झालेली असते.

यात बदल झाला पाहिजे,त्यासाठी पालकांची भूमिका बदलायला हवी.पालकांनी मुलींना केवळ 'संसार करणे आणि सहन करणे' एवढेच न शिकवता, त्यांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनवले पाहिजे. जेणेकरून सासरच्या छळाला भीक न घालता त्या ताठ मानेने उभ्या राहू शकतील. मुलगी झाली म्हणून सासरचे लोक छळ करत असतील, तर "सहन कर, हळूहळू सवय होईल" असा सल्ला देण्याऐवजी, पालकांनी तात्काळ आपल्या मुलीला पाठीशी घातले पाहिजे. सासरच्या लोकांविरोधात पोलिसात तक्रार दाखल करण्याचे धैर्य दाखवले पाहिजे.केवळ मुलगी झाली म्हणून सुनेचा छळ करणाऱ्या आणि हुकूमशाही गाजवणाऱ्या सासू, सासरे आणि पतीवर समाजाने अधिकृतपणे बहिष्कार टाकला पाहिजे. अशा लोकांना समाजात कोणतीही प्रतिष्ठा मिळता कामा नये.

आज आपण २१ व्या शतकात जगत आहोत. स्त्री शिक्षणाचा प्रसार झाला आहे, महिला अंतराळापर्यंत झेप घेत आहेत आणि राष्ट्रपती पदापासून ते देशाच्या संरक्षण दलापर्यंत प्रत्येक क्षेत्रात महिला आपले कर्तृत्व सिद्ध करत आहेत. परंतु, या तथाकथित आधुनिकतेचा बुरखा फाडणारे एक अत्यंत भीषण आणि लज्जास्पद वास्तव आपल्याच आजूबाजूला घडत आहे. ते म्हणजे,फक्त मुलगी झाली म्हणून विवाहितेचा केला जाणारा अमानुष छळ! कोल्हापूरची ही घटना केवळ एका अस्मिताची आत्महत्या नाही, तर ती आपल्या संपूर्ण सामाजिक व्यवस्थेची झालेली हत्या आहे. कायदे कितीही कडक केले, तरी जोपर्यंत लोकांची मानसिकता बदलत नाही, तोपर्यंत या घटना थांबणार नाहीत. मुलींना केवळ 'सहनशीलता' शिकवण्याऐवजी 'स्वाभिमान' आणि 'प्रतिकार' शिकवण्याची वेळ आली आहे. नाती टिकवण्याच्या नावाखाली स्वतःला संपवण्यापेक्षा, अशा नरकयातनेतून ताठ मानेने बाहेर पडणे आणि समाजाने अशा हुकूमशाही, सरंजामशाही प्रवृत्तीच्या सासरच्या लोकांवर कडक सामाजिक बहिष्कार टाकणे हीच आजच्या काळाची खरी गरज आहे. अन्यथा, दररोज ८ गृहिणींच्या आत्महत्यांची आकडेवारी उद्या आणखी वाढेल आणि आपण फक्त हळहळ व्यक्त करण्यापलीकडे काहीच करू शकणार नाही. ज्या समाजात स्त्रीला 'शक्ती' आणि 'माता' म्हणून पुजले जाते, त्याच समाजात एका चिमुकलीच्या जन्मामुळे तिच्या आईला गळफास घ्यावा लागत असेल, तर आपण स्वतःला 'सुसंस्कृत' म्हणवून घेऊ शकत नाही. विचारी समाज म्हणून आपण जागे कधी होणार, हाच आजचा सर्वात मोठा यक्षप्रश्न आहे. यासाठी कौटुंबिक हिंसाचार किंवा या मानसिकतेविरुद्ध आपल्या अवतीभवती अशी लक्षणे दिसल्यास समाज म्हणून आपण वेळीच आवाज उठवणार की नाही, हाच आजचा मुख्य प्रश्न आहे.

– ९५६१५९४३०६

# हा निव्वळ योगायोग की भाग्याचे संकेत ?

डॉ.दत्ता विघावे
क्रिकेट समिक्षक

स्पेनने २०२६ चा फिफा विश्वचषक जिंकल्यानंतर सोशल मीडियावर एक रंजक योगायोग व्हायरल होऊ लागला आहे. फुटबॉल आणि क्रिकेट चाहते २०१० आणि २०२२ च्या घटनांना जोडून, भारत २०२७ चा एकदिवसीय विश्वचषक जिंकू शकतो असा दावा करत आहेत. हा केवळ एक योगायोग असला तरी, यामुळे क्रीडा चाहत्यांमध्ये निश्चितच एका नवीन चर्चेला सुरुवात झाली आहे.

**हा व्हायरल झालेला योगायोग काय आहे ?**

सोशल मीडियावर शेअर केल्या जात असलेल्या पोस्टनुसार, स्पेनने २०१० मध्ये पहिल्यांदा फिफा विश्वचषक जिंकला होता. त्यानंतरच्या वर्षी, २०११ मध्ये, महेंद्रसिंग धोनीच्या नेतृत्वाखाली भारताने २८ वर्षांनंतर एकदिवसीय विश्वचषक जिंकला.

यानंतर, अर्जेंटिनाने २०२२ मध्ये फिफा विश्वचषक जिंकला. पुढच्या वर्षी, २०२३ मध्ये, भारत एकदिवसीय विश्वचषकाच्या अंतिम फेरीत पोहोचला, पण ऑस्ट्रेलियाकडून पराभूत झाला. आता, २०२६ मध्ये स्पेन पुन्हा एकदा फुटबॉल विश्वविजेता बनला आहे, आणि २०२७ मध्ये क्रिकेट विश्वचषक खेळवला जाणार आहे. काही चाहत्यांना वाटते की इतिहासाची पुनरावृत्ती होऊ शकते.

**अर्जेंटिनाच्या योगायोगाचीही चर्चा**

व्हायरल पोस्टचा आणखी एक पैलू देखील लक्ष वेधून घेत आहे. २०२२ मध्ये, लिओनेल मेस्सीच्या नेतृत्वाखाली अर्जेंटिनाने फिफा विश्वचषक जिंकला. पुढच्या वर्षी, भारत मायदेशात क्रिकेट विश्वचषकाच्या अंतिम फेरीत पोहोचला, पण विजेतेपद पटकावण्यात अपयशी ठरला. यामुळेच काही लोक गंमतीने म्हणत आहेत की स्पेनचा विजय भारतासाठी अधिक शुभ ठरतो, तर विजयानंतर नशीब अर्जेंटिनाची साथ देत नाही.

**योगायोग, भविष्यवाणी नाही**

तथापि, क्रीडा तज्ञ अशा योगायोगांना केवळ मनोरंजक आकडेवारी मानतात. फुटबॉल आणि क्रिकेट हे दोन वेगवेगळे खेळ आहेत आणि त्यांच्या निकालांमध्ये थेट संबंध नसतो. कोणत्याही विश्वचषकाचा निकाल हा खेळाडूंचा फॉर्म, संघाची रचना, रणनीती, परिस्थिती आणि मोठ्या सामन्यांमधील कामगिरीवर अवलंबून असतो, मागील वर्षांतील योगायोगांवर नाही.

तरीही, क्रीडा चाहते असे मनोरंजक नमुने शोधण्याची आणि त्यावर चर्चा करण्याची संधी कधीही सोडत नाहीत. म्हणूनच, स्पेनच्या फिफा विश्वचषक विजयानंतर, २०२७ च्या क्रिकेट विश्वचषकाबाबत उत्सुकतेची लाट सुरू झाली आहे. आता, हा योगायोग पुन्हा एकदा खरा ठरतो की २०२७ चा विश्वचषक एक नवीन कथा लिहील, हे पाहणे मनोरंजक ठरेल. सध्या तरी, हा केवळ एक मनोरंजक नमुना आहे जो सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे आणि क्रीडा चाहते आपापल्या दृष्टिकोनातून त्याचा अर्थ लावत आहेत.



**भारतीय संघ इंग्लंडकडून पराभूत**

मात्र, भारतीय संघ चांगल्या फॉर्ममध्ये नाही. रविवारी, इंग्लंडने तिसऱ्या आणि निर्णायक एकदिवसीय सामन्यात भारतीय संघाला पराभूत केले. या विजयासह इंग्लंडने तीन सामन्यांची एकदिवसीय मालिका २-१ ने जिंकली. सॅम करनच्या भेदक गोलंदाजीच्या जोरावर इंग्लंडने भारताला २७ धावांनी पराभूत केले. यापूर्वी भारतीय संघ इंग्लंडविरुद्धची टी-२० मालिकाही ४-० ने हरला होता. रविवारी ऐतिहासिक लॉर्ड्सच्या मैदानावर खेळल्या गेलेल्या सामन्यात, नाणेफेक गमावून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतल्यानंतर इंग्लंडने ५० षटकांत तीन गडी गमावून ३८७ धावा केल्या. प्रत्युत्तरात, भारतीय संघ निर्धारित षटकांत सात गडी गमावून केवळ ३६० धावाच करू शकला. रोहित शर्मांने संघासाठी १३८ धावांची शानदार खेळी केली, तर शुभमन गिल आणि विराट कोहलीने अर्धशतके झळकावली.

योगायोगाने घडलेल्या घटना मग त्या कशाच्याही असो वा कोणत्याही; ऐकायला - वाचायला मनोरंजक असतात. परंतु असे सुवर्ण योग दरवेळेस जुळतीच असे नाही. मात्र ते घडलेच तर ते निव्वळ योगायोगही असू शक्त नाहीत. मात्र त्या घडल्याच तर इतिहास दफ्तरी त्याच्या नोंदी योगायोग म्हणूनच गणल्या जातात.

– ९०९६३७२०८२

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून मुद्रक मुद्रक अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

# दडपशाहीच्या निषेधार्थ नगरसेवक, पश्चिम नागपूर काँग्रेस नेते आक्रमक

## धर्मेंद्र प्रधान व पंतप्रधान मोदींच्या राजीनाम्याची मागणी

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी, काँग्रेसचे वरिष्ठ नेते व युवकांनी नवी दिल्ली येथे केलेल्या शांततापूर्ण लोकशाही आंदोलनाचे पोलिसांच्या माध्यमातून करण्यात आलेल्या दमनाच्या निषेधार्थ पश्चिम नागपूर काँग्रेसचे नगरसेवक, पदाधिकारी व शेकडो कार्यकर्त्यांनी जुना काटोल नाका चौक येथे जोरदार निदर्शने करत केंद्र सरकारविरोधात तीव्र घोषणाबाजी केली.
यावेळी आंदोलकांनी ठएएळ प्रश्नपत्रिका गळती प्रकरण, शिक्षण व्यवस्थेतील कथित त्रुटी आणि विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी झालेल्या गंभीर अन्यायाची नैतिक जबाबदारी स्वीकारून केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी तात्काळ राजीनामा द्यावा, अशी मागणी केली. तसेच शांततापूर्ण आंदोलन करणाऱ्या काँग्रेस नेते व युवकांवर करण्यात आलेल्या कारवाईचा निषेध नोंदवत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही नैतिक जबाबदारी स्वीकारून पदाचा राजीनामा द्यावा, अशी मागणी आंदोलकांनी केली.
आंदोलनादरम्यान वक्त्यांनी सांगितले की, भारतीय राज्यघटनेने प्रत्येक नागरिकाला शांततापूर्ण आंदोलन करण्याचा मूलभूत अधिकार दिला आहे. हा अधिकार दडपण्याचा कोणालाही अधिकार नाही. विद्यार्थी व युवकांच्या भविष्याशी खेळणारे, युवकविरोधी धोरणे राबविणारे आणि "असत्य का सौदागर" म्हणून ओळखले जाणारे पंतप्रधान नरेंद्र मोदी लोकशाहीचा आवाज कितीही दडपण्याचा प्रयत्न करीत असले तरी जनतेचा संघर्ष थांबवू शकणार नाहीत. नीट प्रश्नपत्रिका गळतीमुळे लाखो विद्यार्थ्यांच्या भविष्याचे अपरिमित नुकसान झाले असून, या संपूर्ण प्रकरणाची जबाबदारी निश्चित करून धर्मेंद्र प्रधान यांना केंद्रीय मंत्रिमंडळातून तात्काळ हटविण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली.




या निदर्शनात नागपूर महानगरपालिकेतील विरोधी पक्षनेते संजय महाकळकर, नगरसेवक प्रमोदसिंग ठाकूर, अतुल कोटेचा, शैलेश पांडे, वसीम खान, विवेक निकोसे, प्रगती रोहित यादव, मेरीस्टेला देवा उसरे, सुनीता दीपक तबाने, सरस्वती विजय सलामे, सीमा अरुण दावरे, मंजू गणेश चाचेरकर, अभिजीत प्रभुकांत झा तसेच पश्चिम नागपूर काँग्रेसचे पदाधिकारी रिझवान खान रूमवी, रोहित यादव, स्नेहा निकोसे, नागेश राऊत, नितीन महुरे, रवींद्र भावे, लंकेश उईके, टिंकू कांबळे आणि मोठ्या संख्येने काँग्रेस नेते व कार्यकर्ते उपस्थित होते.
यावेळी आंदोलकांनी इशारा दिला की, केंद्र सरकारने विरोधी पक्षाचा आवाज दडपण्याचे, लोकशाही मूल्यांची पायमल्ली करण्याचे आणि युवकांच्या भवितव्याशी खेळण्याचे धोरण तात्काळ थांबवावे. अन्यथा काँग्रेस पक्ष रस्त्यावर उतरून राज्यभर तीव्र जनआंदोलन उभारेल आणि लोकशाहीच्या रक्षणासाठी अधिक व्यापक संघर्ष छेडेल.

## सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता पसरविणाऱ्या २९१ प्रकरणांची नोंद

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
नागपूर महानगरपालिकेच्या उपद्रव शोध पथकाद्वारे सार्वजनिक ठिकाणी लघुशंका करणाऱ्यांवर, कचरा फेकणाऱ्यांवर, थुंकणाऱ्यांवर, ७९ मायक्रॉन पेक्षा कमी प्लास्टिक पिशवीचा वापर करणाऱ्यांवर अधिक कठोर कारवाई केली जात आहे. पथकाने २९१ प्रकरणांची नोंद करून २,४०,३०० रुपयाचा दंड वसूल केला. सार्वजनिक ठिकाणी रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा ठिकाणी/ उघडयावर मलमुत्र विसर्जन करणे या अंतर्गत ७ प्रकरणाची नोंद करून ३५०० रूपयाची वसुली करण्यात आली. हाथगाडया, स्टॉल्स, पानठेले, फेरीवाले, छोटे भाजी विक्रेते यांनी लगतच्या परिसरात अस्वच्छता (रु. ४०० दंड) या अंतर्गत ७९ प्रकरणांची नोंद करून ३१,६०० रुपयांची वसुली करण्यात आली. व्यक्तीने रस्ता, फुटपाथ,मोकळी जागा अशा ठिकाणी कचरा टाकणे या अंतर्गत १४ प्रकरणाची नोंद करून १४०० रूपयाची वसुली करण्यात आली. दुकानदाराने रस्ता, फुटपाथ,मोकळी जागा अशा ठिकाणी कचरा टाकणे या अंतर्गत २३ प्रकरणाची नोंद करून ९२०० रूपयाची वसुली करण्यात आली. मॉल,उपहारगृहे,लॉजिंग,बोर्डिंगचे हॉटेल, सिनेमाहॉल,मंगल कार्यालये,कॅटरर्स सर्व्हिस प्रोव्हायडर इत्यादींनी रस्ता, फुटपाथ,मोकळी जागा अशा ठिकाणी कचरा टाकणे या अंतर्गत २५ प्रकरणाची नोंद करून ५०,००० रूपयाची वसुली करण्यात आली. वाहतुकीचा रस्ता मंडप,कमान,स्टेज इत्यादी रचना करून अथवा वैयक्तिक कामाकरिता बंद करणे या अंतर्गत १ प्रकरणाची नोंद करून १०,००० रुपयाची वसुली करण्यात आली.

## कोदामेंढीत रक्तदान शिबिर यशस्वीरित्या संपन्न



**दै. सिंहवाणी वृत्त, कोदामेंढी**
देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या जन्मदिनानिमित्त भाजपा मौदा तालुक्याच्या वतीने कोदामेंढी येथे गर्देश्वरी मंदिर परिसरात भव्य रक्तदान शिबिर यशस्वीरित्या संपन्न झाले. शिबिरात २० रक्तदानदात्यांनी रक्तदान केले.
याप्रसंगी भगवान बावनकुळे- भाजपा मंडळ अध्यक्ष मौदा तालुका, मोरेश्वर सोरते भाजपा शहर अध्यक्ष मौदा, प्रसन्ना (राजा) तिडके नगराध्यक्ष नगरपंचायत मौदा, नरेश मोटघरे तालुका समन्वय समिती अध्यक्ष तथा भाजपा प्रभारी मौदा, बंटी हटवार भाजपा युवा मोर्चा शहर अध्यक्ष मौदा, नरेशजी बावनकुळे तालुका समन्वय समिती सदस्य मौदा, गोपाल गिरमेकर उपसरपंच ग्रामपंचायत कोदामेंढी, राहुल पोटभरे नगरसेवक नगरपंचायत मौदा, मुकेश अग्रवाल माजी भाजपा तालुका अध्यक्ष मौदा,राधा अग्रवाल माजी जि.प. सदस्य, रेवा देशमुख सरपंच बेरडेपार, विशाल सेलोकर सरपंच बोरी (घिवारी), अमित तिल्लीखेडे उपसरपंच ग्रामपंचायत धानोली, प्रविण कारेमोरे, नीलेश बावनकुळे, चंद्रशेखर जाधव, विनोद मदनकर, स्वरूप गहेरवार,अंकित वाडिभस्मे, राहुल हटवार, निखिल बडवाईक, गुड्डू पाथुरकर, सौरभ खरवडे तसेच मौदा तालुक्यातील सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. रक्तदान हेच श्रेष्ठदान या भावनेतून अनेक रक्तदान दात्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत सामाजिक बांधिलकी जपल्याबद्दल आयोजकांनी रक्तदानदात्यांचे मनापासून आभार मानले.

## दिव्यांगांनी आपल्यातील कौशल्य ओळखून आत्मविश्वासाने स्वतःची प्रगती करावी : माधव गोडस

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
दिव्यांगांनी आपल्यातील कौशल्य ओळखून आत्मविश्वासाने स्वतःची प्रगती करावी.आपण कुठेही कमकुवत नाही असे समजावे, असे प्रतिपादन रा स्व संघाचे धरमपेठ भाग बौध्दिक प्रमुख श्री माधव वसंतराव गोडसे यांनी दिव्यांगाच्या क्षेत्रात कार्यरत असलेल्या सक्षम या संस्थेच्या स्थापना दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात केले.
सक्षम संस्थेचा १९ वा स्थापना दिनाचा कार्यक्रम नागपूर येथील वीर सावरकर सभागृहात आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रा. स्व संघाचे लालगंज भाग संघचालक अविनाश आवळे होते. तसेच मुख्य अतिथी म्हणून अविष्कार संस्थेच्या अध्यक्षा यशश्री गजानन वाघ होत्या.यावेळी संस्थेचे महानगर अध्यक्ष डॉ मिलिंद हरदास व्यासपीठावर उपस्थित होते.
कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दिपप्रज्वलन करून करण्यात आली तसेच भारतमाता, पू.गुलाबराव महाराज,संत सूरदास आणि अष्टावक्र यांच्या प्रतिमेला पुष्पमाला अर्पण केले.
महानगर अध्यक्ष डॉ. मिलिंद हरदास यांनी उपस्थितांसमोर संस्थेचे उद्दिष्ट ठेवून कायार्चा आढावा घेतला.म्हणूनच दिव्यांगांना डिसेबल न मानता डिफ्रेंटली एबल मानायला हवे असे म्हणत त्यांच्या क्षमतेचा विकास करण्यासाठी आणि त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी हा कौतुक सोहळा आयोजित करण्यात आला आहे असे प्रास्ताविक आणि आभार प्रदर्शनात सांगितले.




प्रमुख वक्ते माधव गोडसे यांनी यावेळी २०२३ मध्ये अर्जुन पुरस्कार प्राप्त आंतरराष्ट्रीय पॅराऑलिम्पिक तिरंदाज शितलादेवी यांनी यश कसे संपादन केले याची माहिती विषद करताना मनात जिद्द, चिकाटी असेल तर अलौकिक यश नक्कीच मिळवता येते असे सांगून उपस्थित दिव्यांग विद्यार्थ्यांमध्ये उत्साह निर्माण केला.
मुख्य अतिथी यशश्री ताई वाघ यांनी आपल्या आयुष्याची वाटचाल आणि त्यासाठी करावा लागणारा संघर्ष कथन केला. मनात कोणताही न्यूनगंड न बाळगता आधी स्वतःच स्वतःचा आदर करायला शिका आणि जिद्दीने स्वतःची प्रगती केली पाहिजे तरच समाज तुमचा आदर करेल असा उपदेश केला. कार्यक्रमाचे अध्यक्ष अविनाश आवळे उपस्थित दिव्यांग गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आणि त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.
या कार्यक्रमात दहावी आणि बारावीच्या परीक्षेत गुणवत्तेत उत्तीर्ण झालेल्या एकूण ६० दिव्यांग विद्यार्थ्यांना गुणवत्ता प्रमाणपत्र व रोख रक्कमेचे पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.यावेळी आंतरराष्ट्रीय किर्तीची दृष्टीबाधित जलतरणपटू ईश्वरी पांडे हिचे ही कौतुक करण्यात आले. सक्षम संस्थेतर्फे येत्या काळात दिव्यांगासाठी क्रिडा स्पर्धा तसेच त्यांच्या कलागुणांना वाव मिळावा यासाठी खास दिव्यांगाचा वाद्यवृंद तसेच स्वमग्न मुलांच्या पुनर्वसनाचा उपक्रम हाती घेण्यात येणार आहे असे यावेळी जाहीर करण्यात आले.
कार्यक्रमामध्ये माणिक सराफ यांनी संघटन मंत्र म्हणून त्याचा अर्थ विशद केला तर संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अंजली वाघ यांनी केले.
या कार्यक्रमाला संस्थेचे विदर्भ प्रांत अध्यक्ष विजयसिंह मोहता, प्रांत संघटन मंत्री आशुतोष देशपांडे,प्रांत उपाध्यक्ष रामदेव अग्रवाल, प्रांत सचिव जितेंद्र धाकुलकर, कोषाध्यक्ष विनय निजसूरे, माधव नेत्रालयचे महासचिव अविनाश अग्निहोत्री, संदीप धर्माधिकारी, संस्थेचे महानगर सचिव संजय पाटील, सहसचिव मनीष केसरवानी, सचिन देशपांडे, कोषाध्यक्ष अरुण पलांदूरकर, सह कोषाध्यक्ष कमलकिशोर सारडा,रोजगार प्रमुख उदय राव, दिनेश शर्मा, दिनेश देशपांडे, सुनील पारेख, अर्जुन सिंग बघेल, संजय बोभाटे,अमन द्विवेदी, शिरीष दारव्हेकर, धनंजय उपासनी, शेखर दारव्हेकर जयश्री देशपांडे, अर्चना श्रावणे, अर्चना दिघे, प्रज्ञा राऊत, प्रज्ञा अनासने इत्यादी कार्यकर्ते तसेच दिव्यांग विद्यार्थ्यांचे पालक, शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कल्याण मंत्राने कार्यक्रमाची सांगता झाली.

## पहिल्याच जोरदार पावसात खरबी जि.प. शाळेला आले तलावाचे स्वरूप

### ग्रामपंचायतीच्या ढिसाळ नियोजनामुळे विद्यार्थ्यांचा जीव धोक्यात

**दै. सिंहवाणी वृत्त, तुमसर**
तुमसर तालुक्यातील खरबी येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेच्या परिसरात २० जुलै रोजी दुपारी ३:१५ वाजता झालेल्या अचानक आणि मुसळधार पावसामुळे गंभीर पूरजन्य परिस्थिती निर्माण झाली. अवघ्या एका तासाच्या मुसळधार पावसामुळे शाळेच्या संपूर्ण पटांगणात पाणीच पाणी साचले, ज्यामुळे शाळेच्या आवाराला चक्क 'तलावाचे' स्वरूप आले होते. ग्रामपंचायतीच्या ढिसाळ आणि अकार्यक्षम नियोजनाचा फटका थेट चिमुरड्या विद्यार्थ्यांना बसल्याने गावकऱ्यांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.
सतत एक तास पडलेल्या मुसळधार पावसामुळे शाळेच्या आवारातील साचलेले पाणी बाहेर जाण्यासाठी भिंतीमध्ये केवळ एकच लहान पाईप टाकण्यात आला आहे. पाईपचा व्यास अत्यंत लहान असल्याने पाण्याचा योग्य निचरा होऊ शकला नाही आणि संपूर्ण पटांगणात पाणी साचले. अचानक वाढलेल्या पाणीपातळीमुळे विद्यार्थ्यांना शाळेतून बाहेर काढून घरी पोहोचवणे मोठे आव्हानात्मक ठरले.

**पालक आणि शिक्षकांची तत्परता ठरली तारक**

परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेत शाळा प्रशासनाने तातडीने पालकांना आवाहन केले. या आवाहनाला प्रतिसाद देत पालकांनी तत्परता दाखवली आणि तातडीने हातात छत्र्या घेऊन शाळा गाठली.
शिक्षक व पालकांच्या संयुक्त प्रयत्नांमुळे सर्व विद्यार्थ्यांना कोणतीही हानी न होऊ देता सुखरूप बाहेर काढून त्यांच्या घरी पोहोचवण्यात आले.
पावसाचे पाणी थेट शाळेची स्वयंपाक खोली आणि धान्यसाठा कक्षात शिरल्याने शिक्षकांची मोठी तारांबळ उडाली. मात्र, शिक्षक आणि पालकांनी दाखवलेल्या प्रसंगावधानामुळे शालेय पोषण आहाराचा संपूर्ण धान्यसाठा तात्काळ सुरक्षिततरीत्या



टेबलावर हलवण्यात आला, ज्यामुळे मोठा अनर्थ टळला आणि अन्नधान्याची नासाडी वाचली.

**ग्रामपंचायतीच्या कारभारावर तीव्र संताप**

गावात विकासाच्या मोठमोठ्या बाता मारणाऱ्या ग्रामपंचायतीचे पाणी निचऱ्याबाबतचे नियोजन किती ढिसाळ आहे, हे या घटनेने पुन्हा एकदा उघड केले आहे. पावसाळ्यापूर्वी योग्य व अर्धवट नालेसफाई किंवा पाण्याचा निचरा होण्यासाठी पर्यायी व्यवस्था न केल्यामुळेच आज विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांना या भीषण संकटाचा सामना करावा लागला. भविष्यात अशी पुनरावृत्ती टाळण्यासाठी प्रशासनाने तातडीने योग्य ती उपाययोजना करावी, अशी आक्रमक मागणी संतप्त पालकांकडून केली जात आहे.

## थोडक्यात

### उपजीविका सामाजिक बहुउद्देशीय संस्थेतर्फे नक्षलग्रस्त भागातील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
उपजीविका सामाजिक बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल व गरजू विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने नक्षलग्रस्त अतिदुर्गम भागात शालेय साहित्य वाटपाचा उपक्रम उत्साहात पार पडला. रविवार, १९ जुलै रोजी एओपी पोलीस कॅम्प, गोठणगाव (पोलीस स्टेशन किशोरी हद्द) येथे आयोजित कार्यक्रमात जिल्हा परिषद शाळा केळवद व जिल्हा परिषद शाळा गोठणगाव येथील सुमारे १५० गरजू व गुणवंत विद्यार्थ्यांना शालेय बॅग, वह्या, कंपास बॉक्स तसेच अन्य आवश्यक शालेय साहित्याचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमाला पोलीस निरीक्षक शुभम नवले (पोलीस स्टेशन किशोरी), पोलीस निरीक्षक अरविंद जाधव (सीआरपीएफ एओपी गोठणगाव), डॉ.अनिल बुटले (लायन्स क्लब), समाजसेवक सुहास खरे, मुख्याध्यापक ठाकरे सर, नारायण बुद्धवंत, सतीश भोवते (मेजर, पोलीस स्टेशन गोठणगाव) यांची प्रमुख उपस्थिती होती.
उपक्रमाचे नियोजन एओपी कॅम्प गोठणगावचे पोलीस निरीक्षक निलकंठ गीते यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. संस्थेचे अध्यक्ष धिरज गलगले, कार्याध्यक्ष विलास कडू, अनिल जवाडे, मनीष पाठराबे, उपाध्यक्ष जयंत तुरणकार, सचिव संजय मार्कंडे, कोषाध्यक्ष सौ. मनीषा गलगले, स्वप्नील बाराहाते, प्रमोद पारधी, सौ. करुणा गलगले, साहेबराव पांडव तसेच संस्थेचे सदस्य, पोलीस स्वयंसेवक आणि स्थानिक प्रतिनिधींनी कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मोलाचे योगदान दिले. यावेळी शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद, विद्यार्थी, पालक आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. दुर्गम व नक्षलग्रस्त भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आवश्यक साहित्य उपलब्ध करून देत त्यांच्या शैक्षणिक वाटचालीला बळ देण्याचा संस्थेचा हा उपक्रम समाजाभिमुख आणि प्रेरणादायी ठरल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

### दिल्लीतील नीट आंदोलनाला वाडीतून पाठिंबा, सामाजिक समता मंचाचे धरणे आंदोलन




**दै. सिंहवाणी वृत्त, वाडी**
दिल्ली येथे सुरू असलेल्या नीट व विविध स्पर्धा परीक्षांतील कथित पेपरफुटीविरोधातील विद्यार्थी आंदोलनाला पाठिंबा दर्शवत सामाजिक समता मंचाच्या वतीने बुधवारी दत्तवाडी येथे शांततापूर्ण धरणे आंदोलन करण्यात आले. या आंदोलनातून देशातील शिक्षण व्यवस्था अधिक पारदर्शक व सक्षम करण्याची मागणी करण्यात आली. सामाजिक समता मंचाचे अध्यक्ष राहुल सोनटक्के, सचिव अरविंद बडगे व कार्याध्यक्ष सचिन ढोके यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात पदाधिकारी, विद्यार्थी व नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले. आंदोलनकर्त्यांनी विविध मागण्यांचे फलक हातात घेऊन शासन व प्रशासनाचे लक्ष वेधले. यावेळी वक्त्यांनी कथित पेपरफुटीच्या घटनांमुळे लाखो विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भवितव्यावर परिणाम झाल्याची खंत व्यक्त केली. भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी कठोर कायदेशीर उपाययोजना कराव्यात, दोषींवर कडक कारवाई करावी तसेच या प्रकरणात नैतिक जबाबदारी स्वीकारून केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी करण्यात आली. तसेच सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांना मिळालेल्या वागणुकीबाबतही नाराजी व्यक्त करण्यात आली.
याचवेळी केंद्र सरकारने इथेनॉल मिश्रित पेट्रोलचा वापर अनिवार्य न करता तो ऐच्छिक करावा, अशीही मागणी आंदोलनकर्त्यांनी केली. इथेनॉल मिश्रित पेट्रोलमुळे काही वाहनांमध्ये तांत्रिक बिघाड होत असल्याच्या तक्रारी वाढत असल्याने वाहनधारकांचे नुकसान झाल्यास त्यांना भरपाई देण्याची व्यवस्था करावी, अशी मागणीही निवेदनाद्वारे करण्यात आली. या सर्व मागण्यांचे निवेदन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे पाठविण्यासाठी वाडी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक यांच्या मार्फत सादर करण्यात आले. आंदोलनात सामाजिक समता मंचाचे मिलिंद गाणार, सूरज चोखांद्रे, विजय शेंडे, दिगंबर दरवडे, विकास तभाने, सुरेश सुखदेवे, विक्रांत सांगोळे यांच्यासह कामगार नेते दिलीप बिरे, अनिल बजाईत, बन्सीलाल साकुरे, मेघराज कांबळे, अभय सरकटे, अजय देशमुख, अनिल डोमकुंडवार, अनिता देशभ्रतार, बिपीन टेम्भूरणे, महेंद्र भांगे आणि अनेक नागरिक सहभागी झाले.

### ॲड. मधुकर तिघरे यांचे निधन

**दै. सिंहवाणी वृत्त, मौदा**
मौदा शहरातील ज्येष्ठ काँग्रेस नेते, ज्येष्ठ विधिज्ञ, माजी सरपंच, माजी नगरसेवक तसेच शहरातील पहिले ॲडव्होकेट म्हणून परिचित असलेले



ॲड. मधुकर तिघरे (७३) राहणार जस्तंभ चौक मौदा यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने मौदा शहरात शोककळा पसरली आहे. ॲड. तिघरे यांनी सामाजिक, राजकीय आणि सार्वजनिक क्षेत्रात उल्लेखनीय योगदान दिले. काँग्रेस पक्षाच्या माध्यमातून त्यांनी जनतेच्या विविध प्रश्नांसाठी सातत्याने काम केले. कायदेविषयक मार्गदर्शनासोबतच सर्वसामान्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी त्यांनी नेहमीच पुढाकार घेतला. त्यांच्या कार्यामुळे त्यांनी समाजात एक आदरणीय स्थान निर्माण केले होते. ते मौदा नगरपंचायतीचे नगरउपाध्यक्ष शुभम तिघरे यांचे आजोबा होत.
त्यांच्या पत्नी मालती तिघरे या दोन वेळा जिल्हा परिषद सदस्या म्हणून कार्यरत होत्या आणि त्यांनीही सामाजिक व राजकीय क्षेत्रात उल्लेखनीय योगदान दिले आहे. त्यांच्या निधनाचे वृत्त समजताच विविध क्षेत्रांतील मान्यवर, नागरिक आणि हितचिंतकांनी शोक व्यक्त केला. त्यांच्या पश्चात पत्नी मालती तिघरे, कुटुंबीय, नातेवाईक आणि मोठा मित्रपरिवार असा परिवार आहे. त्यांच्यावर उद्या दुपारी १ वाजता मौदा येथील स्थानिक स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या निधनाने मौदा शहराने एक अनुभवी विधिज्ञ, ज्येष्ठ काँग्रेस नेते आणि समाजाभिमुख व्यक्तिमत्त्व गमावल्याची भावना व्यक्त होत आहे

थोडक्यात

## दोन दिवसाच्या सततधार पावसाने नाल्यावर नवीन पूल बांधकाम करण्याकरिता बनविण्यात आलेला पर्यायी पूल वाहला



**दै. सिंहवाणी वृत्त, कोदामेंढी**

मागील एक वर्षापूर्वीपासून अरोली-पारडीकला-निमखेडा-भेंडाळा-आजनगाव-मौदा या रस्त्याचे सिमेंट करण सुरू असून, खापरखेडा (तेली )ते पारडीखुर्द दरम्यान नाल्यावर नवीन पुलाचे बांधकाम सुरू असून, वाहनधारकांना रहदारीकरिता करिता पयार्यी पूल बनविण्यात आला होता. मात्र मागील दोन दिवसापासून सततधार पाऊस येत असल्याने मौदा तालुक्यातील नदी नाले वाहू लागले आहे व त्यांच्या पाण्याची पातळी सतत वाढत आहे. त्यामुळे खापरखेडा तेली ते पारडी खुर्द दरम्यान नाल्यावरील वाहनधारकांसाठी बनविण्यात आलेला पर्यायी पूल आज बुधवार (ता. २२ जुलै ) रोजी वाहून गेला. त्यामुळे या मार्गावर वाहतूक बंद झालेली आहे. संबंधित कंत्राटदाराने नवीन पुलाचे बांधकाम लवकरात लवकर पूर्ण करून वाहतूक सुरळीत करावी अशी मागणी खापरखेडा (तेली), पारडीखुर्द सह परिसरातील नियमित रहदारी करणाऱ्या दुचाकी,चारचाकी वाहनधारक नागरिकांसह, शेतकऱ्यांनी केली आहे.

## ग्राम पंचायत राजोली येथे माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांची जयंती



**दै. सिंहवाणी वृत्त, कोदामेंढी**

आज बुधवार (ता. २२ जुलै) रोजी ग्रामपंचायत कार्यालय राजोली येथे माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या फोटोला पूजाअर्चना ,माल्यार्पण व त्यांच्या जीवन पटावर प्रकाश टाकून जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी सरपंच योगेश महादुले ग्रामपंचायत सदस्य काशिनाथ पोटभरे ग्रामपंचायत अधिकारी अंकिता चकोले जि प शाळेचे मुख्याध्यापक न कोरिया अंगणवाडी सेविका महादुले, कर्मचारी जितेंद्र तांडेकर, संगणक परिचालक लांजेवार प्रामुख्याने उपस्थित होते. ग्रामपंचायत धनी, विरसी, भेंडाळा सह मौदा तालुक्यातील प्रत्येक ग्रामपंचायत कार्यालयात माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांची जयंती साजरी केल्याचे ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांनी वृत्तपत्र वाटप करत असताना कार्यक्रमाची फोटो दाखवून सांगितले.

## नागपूर ग्रामीण अंमली पदार्थ विरोधी पथकाची मोठी कारवाई; कन्हान हद्दीत लाखांचा मुद्देमाल जप्त



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

दिनांक २१ जुलै २०२६ रोजी नागपूर ग्रामीणच्या अंमली पदार्थ विरोधी पथकाचे पथक कन्हान उपविभागाच्या हद्दीत गस्त घालत असताना, त्यांना गोपनीय बातमीदारा मार्फत माहिती मिळाली की, शोरब जब्बर अन्सारी (वय ४० वर्षे, रा. कॉलनी नंबर ३, कन्हान, कांद्री, तहसील पारशिवनी, जिल्हा नागपूर) हा त्याच्या राहत्या घरी नशा आणण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या गोळ्यांची (टॅब्लेट) किरकोळ विक्री करत आहे. या माहितीच्या आधारे वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या परवानगीने कायदेशीर कारवाई करण्यात आली. संशयित आरोपीच्या ताब्यातून नशा आणणाऱ्या पियॉन स्पास प्लस टॅब्लेटचे एकूण ६६ बॉक्स (एकूण १५,८१४ टॅब्लेट, वजन ७.९०७ किलो), २ मोबाईल फोन, रोख रक्कम आणि १ चारचाकी वाहन असा एकूण ३,६३,०२०/- रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी पोलीस स्टेशन कन्हान येथे एनडीपीएस (ठउद्धर) कायद्याच्या कलम ८ (क), २२ (सी) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील कायदेशीर कारवाई सुरू आहे.

कारवाई पोलीस अधीक्षक हर्ष पोद्दार यांच्या मार्गदर्शनात, अपर पोलीस अधीक्षक अनिल म्हस्के आणि उपविभागीय पोलीस अधिकारी गायकवाड (कन्हान उपविभाग), कारवाई करणारे पथकः सपोनि अजितसिंग देवरे (प्रभारी अधिकारी, अंमली पदार्थ विरोधी पथक), पोउपनि प्रवीण भिमटे, पोहवा प्रवीण देव्हारे, प्रकाश ठोके, अमोल नागरे, अविनाश तोडसाम आणि पोशि अनिल खरडकेले तसेच वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.

## भाजपा आमदाराची भास्कर जाधवांना थेट ऑफर

**रत्नागिरी :** सध्या भाजप आणि शिवसेना पक्षाकडून विरोधी पक्षातील आमदार, खासदार गळाला लावले जात आहेत. नुकतेच ठाकरेंच्या सहा खासदारांनी उद्धव ठाकरेंची साथ सोडून एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश केला. त्यानंतर, ठाकरेंचे आमदारही त्यांची साथ सोडणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात होत आहे. तर, विरोधी पक्षनेते पदासाठी इच्छुक असलेल्या भास्कर जाधवांचेही नाव या यादीत जोडले जाते. मात्र, आता भाजपा आमदारानेच थेट भास्कर जाधव यांना ऑफर दिली आहे. भास्कर जाधव यांची सत्तेत गरज असल्याचं आमदार प्रमोद जठार यांनी म्हटलं. जठार यांच्या वक्तव्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत.

# राज्यातील प्रत्येक घटकाला आदर्श प्रशासनाचा प्रत्यय देऊ !

## महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा वाढदिवस विविध उपक्रमांनी साजरा

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

राज्यातील सर्व समाज घटकातील व्यक्तींना सोबत घेऊन प्रत्येकाला विकासाची संधी भेटली पाहिजे याचे उत्तरदायित्व स्वीकारुन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या कार्यशैलीतून अपूर्व ठसा निर्माण केला आहे. लोकनेतृत्वाचे हे आदर्श मापदंड आहे. याचबरोबर सेवा हेच समर्पण या भुमिकेतून ज्यांनी आयुष्य वेचले असे लोकनेते स्व. अजितदादा पवार यांचा आज स्मृतीदिन आहे. या दिनविशेषाला अधोरेखित करतांना आपण अनेक लोकोपयोगी उपक्रम आज राबवित आहोत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना वाढदिवसानिमित्त या उपक्रमांच्या माध्यमातून सदिच्छा देण्यासह स्व. अजितदादा पवार यांच्या समर्पणाचे कृतज्ञतापूर्वक स्मरण आपण करीत असल्याचे प्रतिपादन राज्याचे महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त व माजी उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या जयतीनिमित्त जिल्हा प्रशासनाच्या वतीने बेलतरोडी येथील पाचमंदिर मैदान येथे आयोजित छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान व महाआरोग्य शिबीर कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी बेसा-पिपळा नगरपरिषदेच्या नगराध्यक्ष कीतीर्ताई बडोले, बहादुरा नगरपंचायतीच्या नगराध्यक्ष प्रतिक्षाताई खंदाडे, उपमहापौर



लिलाताई हाथीबेड, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, उपविभागीय अधिकारी वंदना सवरंगपते व अधिकारी उपस्थित होते.

छत्रपती शिवाजी महाराजांनी लोकाभिमुख, पारदर्शी व गतिमान राज्याचा प्रत्यय देऊन आपल्यापुढे एक आदर्श मापदंड निर्माण केला आहे. याचबरोबर महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानाच्या माध्यमातून सर्वसामान्य जनतेला मौलिक अधिकार दिला. महाराष्ट्राच्या या ऐतिहासिक व सामाजिक उत्तरदायित्वाच्या आदर्शांना डोळ्यापुढे ठेऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली सर्वसामान्यांना आदर्श प्रशासनाचा प्रत्यय यावा याद्दष्टीने आपण महाराजस्व अभियान हाती घेतले असे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले. राज्यातील १४ कोटी जनतेला त्यांच्या हक्कांना न्याय देण्यासह आपण दिलेल्या आश्वासनांची पुर्तता विविध निर्णयांच्या माध्यमातून आपण करीत आहोत. आज या ठिकाणी सुमारे अडीच हजार लाभार्थ्यांना लाभ देत असून सर्व शिबीरांच्या माध्यमातून लाखो बांधवांपर्यंत पोहचत असल्याचे त्यांनी सांगितले.

### राज्यातील प्रत्येकाच्या मालमत्तेचे रक्षणाची जबाबदारी महसूल विभागाची

शासनाचे विश्वस्त म्हणून निष्पक्ष काम करण्याची भूमिका आम्ही स्वीकारली आहे. राज्यातील प्रत्येकाच्या मालमत्तेचे रक्षण ही शासनाची जबाबदारी आहे. याच भूमिकेतून आम्ही प्रत्येकाची जागा कायदेशिर करुन देत आहोत. सोलापूर मधील ९ हजार घरांना मुख्यमंत्र्यांनी कायदेशिर करुन दिले. कोल्हापूर मधील सुमारे ५५ गावे ब्रिटीशकालीन निगडीत होते. येथील ५५ गावांना कायदेशिर करुन देण्यात आले आहे. गडचिरोली येथे फाळणीपासून बांगलादेशी नागरिकांनी तेथे बांधलेल्या घरांचा प्रश्न प्रलंबीत होता. मुख्यमंत्र्यांच्या दूरद्दष्टीखाली आपण तो मार्गी लावला. सुमारे १२ हजार परिवाराला ते राहत असलेल्या जागेचे कायदेशिर मालकत्व देण्यात आले. याचबरोबर फाळणीमध्येच जे सिंधी बांधव अनेक महानगरात विखुरले गेले त्यांचा आजवर स्वमालकीच्या न सुटलेल्या प्रश्नाही आपण अधिकृत करुन दिले असल्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले.

### जे वचन दिले ते नेटाने पूर्ण करू

जे वचन आम्ही जनतेला दिले होते ते मनस्वी पूर्ण करण्याचा संकल्प आम्ही केला आहे. शेतकऱ्यांचे सुमारे ४६ हजार कोटी रुपये एवढे वीजबील व इतर देयके शासनाने माफ केले. बहिणींसाठी लाडकी बहीण योजना सुरु केली. महिलांना शेतकऱ्यांचा दर्जा दिला. त्यांना शेतकरी म्हणून आता आहे त्या सर्व योजना देण्याचा आपण प्रयत्न करु असे त्यांनी सांगितले. १ जानेवारी २०११ पूर्वी ज्या गरिब व्यक्तीनी शासकीय जमिनीवर अतिक्रमण केले अशा लोकांना जागेचा पट्टा आपण दिला. झुडपी जंगलाचे प्रश्न आपण मार्गी लावले आहे.

१५ ऑक्टोबर २०२४ पूर्वी ज्यांनी घर/प्लाट घेतला आहे अशा प्लाटधारकांना आता कायदेशिर दर्जा देण्याचा निर्णय शासनाने घेतला असल्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगून सुमारे ५५ सेवा आपण राजस्व अभियानात समाविष्ट केल्याचे त्यांनी सांगितले. राज्यातील सर्व शिबीरांच्या माध्यमातून सुमारे ९० लक्ष परिवारांना आम्ही आदर्श सेवेचा प्रत्येय दिला आहे.

या शिबीरात २२० लोकांना मालकी हक्काचे पट्टे, ४०० लोकांना स्वामित्व हक्क प्रमाणपत्र, आरोग्य शिबीर, कृषी विभाग, पंचायत समिती, एकात्मिक आदिवासी विभाग व नगरपरिषद, नगरपंचायत अंतर्गत विविध सेवांचे प्रमाणपत्र यावेळी शिबीरात वाटप करण्यात आले. ९८ शेतमजूर महिलांना शासनाच्या नवीन धोरणानुसार शेतकरी प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले. उमरेड येथे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या प्रमुख उपस्थितीत छत्रपती शिवाजी महाराज १०१ लाभार्थ्यांना पट्टे वितरण व इतर विविध लाभांचे वाटप महसूल विभागाच्या वतीने करण्यात आले.

### सफाई कामगारांच्या योगदानाचा गौरव

सफाई कामगारांच्या कार्याच्या गौरवातून आपण खऱ्या अर्थाने आजचा हा अनोखा दिवस सेवा समर्पण दिवस म्हणून साजरा करीत आहोत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सफाई कामगारांसाठी व्यापक परिवर्तनाची मुहूर्तमेढ रोवली. लाडपागे समिती अंतर्गत सफाई कर्मचाऱ्यांना न्याय मिळवून देण्यासह त्यांच्या परिवारातील लोकांनाही स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध व्हावी ही शासनाची भूमिका आहे. महाराष्ट्र राज्य सफाई कर्मचारी आयोगाच्या माध्यमातून अध्यक्ष शेरसिंग डागोर यांनी अनेक चांगले उपक्रम आयोजित करुन महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराला जपत समाजाला दीशा दिल्याचे गौरोद्गार राज्याचे महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी काढले.

सफाई कामगारांच्या कष्टाचा गौरव व्हावा याउद्देशाने इमामवाडा आयसोलेशन हॉस्पीटलच्या परिसरात आयोजित भव्य सेवा गौरव दिन समारंभात ते बोलत होते. यावेळी महापौर निताताई ठाकरे, आमदार मोहन मते, आमदार डॉ. परिणय फुके, उपमहापौर लिलाताई हाथीबेड,माजी महापौर दयाशंकर तिवारी, स्थायी समितीच्या अध्यक्षा शिवाणी दाणी, मनपा आयुक्त डॉ. विपीन इटनकर, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, समाज कल्याण विभागाचे प्रादेशिक उपायुक्त प्रसाद कुलकर्णी, सहाय्यक आयुक्त सुकेशिनी तेलगोटे आदी मान्यवर उपस्थित होते.

राज्यात प्रथमच एवढया मोठ्या प्रमाणात सफाई कामगारांच्या योगदानाचा गौरव होत असल्याचे शेरसिंग डागोर यांनी आपल्या प्रस्ताविक भाषणात सांगितले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लाडपागे समितीची प्रभावी अंमलबजावणी करुन यात असलेल्या यात असलेल्या त्रुटींना दूर करीत अधिकाधिक लोकांना न्याय दिला आहे. त्यांच्या दूरद्दष्टीतूनच सफाई कामगारांच्या मुलांनाही आता किराण दुकान, शिलाई मशिन, सायकल, ई-रिक्षा याच्या माध्यमातून स्वयंरोजगाराला चालना देत असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी महापौर निता ठाकरे, माजी महापौर दयाशंकर तिवारी व मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी सुमारे १ हजार २०० लाभधारकांना विविध साहित्याचे वाटप करण्यात आले. यात सुमारे पाचशे महिलांना शिलाई मशिन वाटप, ई-रिक्षा, सायकल आदींचा समावेश होता.

## मुख्यमंत्र्यांच्या वाढदिवसानिमित्त हिमोग्लोबिनोपॅथी कॅम्प

### थेलेसीमिया डे केयरचा लाभ घ्यावा : डॉ. पुरुषोत्तम पटले

**दै. सिंहवाणी वृत्त, गोंदिया**

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त २२ जुलै २०२६ रोजी राज्यभर हिमोग्लोबिनोपॅथी (सिकलसेल व थॅलेसेमिया) आजारांचे निदान, प्रतिबंध व व्यवस्थापन अधिक प्रभावी करण्यासाठी विशेष आरोग्य उपक्रमाचे आयोजन विशेष अभियानांतर्गत सर्व शासकीय आरोग्य संस्थांमध्ये विशेष HPLC तपासणी शिबिरे आयोजित करण्यात आली होती याचाच एक भाग म्हणून आज BGW येथे गर्भवती माता, सिकलसेल व थॅलेसेमिया रुग्णांसाठी सर्वसमावेशक आरोग्य सेवा कॅम्प चे आयोजन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ पुरुषोत्तम पटले



यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आला होता . या कॅम्पचे उद्घाटन GMC चे अधिष्ठाता कुसुमाकर घोरपडे यांच्या शुभ हस्ते करण्यात आले. अध्यक्ष स्थानी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ पुरुषोत्तम पटले होते.

वैद्यकीय अधीक्षक डॉ. मरसकोल्हे डॉ. पावडे, बालरोग एचओडी डॉ. लीना धांडे, डॉ. सचिन उइके आणि या कॅम्पमध्ये विशेष स्पेशालिस्ट अधीक्षक डॉ. नितिका पोयांम, सहअधीक्षक डॉ. राऊत, डॉ. गरिमा बग्गा, डॉ. सोनल कोटांगळे, डॉ. सुवर्णा हुबेकर, डॉ. बी. डी जैस्वाल, डॉ. गुरूप्रसाद खोब्रागडे, डॉ. बेलंबकर, डॉ. अनिल आटे RBSK डॉ. संजय बिसेन सिकल सेलच्यासपना खंडाईत प्रामुख्याने उपस्थित होत्या.

कॅम्पचे प्रास्ताविक डॉ. सुवर्णा हुबेकर यांनी सांगितले. जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. पुरुषोत्तम पटले यांनी थालेसेमिया डे केयर सेंटर चा लाभ घेण्याचे आवाहन केले. बालरोग विभाग प्रमुख लीना धांडे यांनी थालेसेमिया रुग्णांना आरोग्य विषयक टिप्स दिल्या. GMC चे अधिष्ठाता डॉ कुसुमाकर घोरपडे यांनी सांगितले की आज माननीय उटड यांच्या वाढदिवसा निमित्ताने मोफत थालेसेमिया स्क्रिनिंग कॅम्प आयोजित करण्यात आला आहे त्याचा लाभ घ्यावा. गर्भवतीची HPLC अनिवार्य करण्यात येत आहे अशी माहिती डॉ. गरिमा बग्गा यांनी सांगितले.

या वेळी उपस्थित माता पालकांना सिकल सेल बाबत माहिती पत्रके वाटण्यात आली. या कॅम्प मध्ये ५७ बालकांनी लाभ घेतला. BGW येथील सर्व पॅरामेडिकल स्टाफ यांनी कॅम्प करिता सहकार्य केले.

## प्रशिक्षणस्थळी शिक्षकांच्या मूलभूत सुविधांचा अभाव; महिला शिक्षकांच्या शौचालयाची दयनीय अवस्था

**दै. सिंहवाणी वृत्त, सालेकसा-राजु फुंडे**

पंचायत समिती सालेकसा अंतर्गत इयत्ता ६ वीच्या नवीन अभ्यासक्रमाचे तालुकास्तरीय प्रशिक्षण दि. २० ते २३ जुलै २०२६ या कालावधीत केंद्रीय वरिष्ठ प्राथमिक शाळा आमगांव खुर्द ता, सालेकसा येथे आयोजित करण्यात आले आहे. मात्र या प्रशिक्षणस्थळी शिक्षकांसाठी आवश्यक असलेल्या मूलभूत सुविधांचा गंभीर अभाव असल्याची तक्रार सहभागी शिक्षकांकडून व्यक्त होत आहे. प्रशिक्षणासाठी आलेल्या शिक्षकांच्या म्हणण्यानुसार, प्रशिक्षणस्थळी शिक्षकांसाठी स्वतंत्र व स्वच्छ शौचालयाची सुविधा उपलब्ध नाही. विशेषतः महिला शिक्षकांसाठी असलेले शौचालय अत्यंत घाणेरड्या अवस्थेत असून त्याची नियमित स्वच्छता होत नसल्याने महिला शिक्षकांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. शिक्षण विभागाकडून शिक्षकांना दर्जेदार प्रशिक्षण देण्यावर भर दिला जात असताना, प्रशिक्षणस्थळी पिण्याचे पाणी, स्वच्छ शौचालय आणि स्वच्छ परिसर यांसारख्या मूलभूत सुविधा उपलब्ध असणे तितकेच आवश्यक असल्याचे शिक्षकांनी नमूद केले.

महिला शिक्षकांनी सांगितले की, अस्वच्छ शौचालयामुळे आरोग्याचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता असून, प्रशिक्षणादरम्यान मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. संबंधित प्रशासनाने या बाबीकडे तातडीने लक्ष देऊन स्वच्छता व आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी करण्यात येत आहे. शिक्षक संघटनांनीही प्रशिक्षणस्थळी मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणे ही प्रशासनाची जबाबदारी असल्याचे सांगत, स्वच्छ व सुरक्षित वातावरणात प्रशिक्षण घेण्याचा शिक्षकांचा हक्क अबाधित ठेवावा, अशी मागणी केली आहे.

# स्मार्ट मीटरच्या विरोधात बल्लारपूरमध्ये जनआक्रोश : महावितरणवर मनमानीचा आरोप

**दै. सिंहवाणी वृत्त, बल्लारपूर**

महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी (महावितरण)कडून घराघरांत स्मार्ट मीटर बसविण्याच्या मोहिमेविरोधात आणि वाढीव वीजबिलांच्या कथित तक्रारींच्या पार्श्वभूमीवर बल्लारपूर कृती समितीच्या नेतृत्वाखाली नगर परिषद चौकात मंगळवारी मोठे जनआंदोलन करण्यात आले. सकाळी ११ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत मुसळधार पाऊस सुरू असतानाही शेकडो नागरिक आंदोलनस्थळी ठामपणे उपस्थित राहून स्मार्ट मीटर योजना रद्द करण्याची मागणी करत महावितरणविरोधात जोरदार घोषणाबाजी केली.

आंदोलनाची सुरुवात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यांना पुष्पहार अर्पण करून करण्यात आली.

त्यानंतर झालेल्या सभेत विविध मान्यवरांनी महावितरणवर नागरिकांची संमती न घेता स्मार्ट मीटर बसविण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप केला.

वक्त्यांनी असा दावा केला की, स्मार्ट मीटर बसविल्यानंतर अनेक ग्राहकांना पूर्वीपेक्षा अधिक वीजबिले येत असल्याच्या तक्रारी वाढल्या



आहेत. महागाईच्या काळात गरीब, शेतकरी, कामगार आणि मध्यमवर्गीय कुटुंबांवर अतिरिक्त आर्थिक भार टाकणे अन्यायकारक असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी उपस्थित नेत्यांनी इशारा देत सांगितले की, स्मार्ट मीटर सक्तीने बसविण्याची प्रक्रिया तातडीने थांबवून वाढीव वीजबिलांची निष्पक्ष चौकशी करण्यात आली नाही, तर आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल. हा केवळ वीजबिलांचा प्रश्न नसून सामान्य नागरिकांच्या हक्कांचा आणि त्यांच्या आर्थिक हिताचा विषय असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

या आंदोलनात माजी नगराध्यक्ष घनश्याम मूलचंदानी, प्रशांत झांमरे, नगर परिषद उपाध्यक्ष देवेंद्र आर्य, नगरसेवक सिक्की यादव, अब्दुल करीम शेख, इस्माईल ढाकवाला, भास्कर मकोडे, भारत थुलकर, कुतुबुद्दीन सिटी, उमेश कडू, पवन मेश्राम, नरेंद्र सोनारकर, मंगेश बावने, कल्पना गोरघाटे, ज्योती गहलोत, शाहिद शेख, अभिलाष चुनारकर, अफजल शेख आदींनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सूरज चौबे, रोहित चुटे, अजय गिदवानी,

**स्मार्ट मीटर योजना मागे घेण्याची मागणी**

कैलाश धानोरकर, गौतम रामटेके, युसूफ, प्रकाश पाठक आणि अन्य कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सूरज चौबे यांनी केले, तर रोहित चुटे यांनी आभार मानले. यावेळी मोहम्मद रफीक यांनी सादर केलेल्या देशभक्तीपर गीतांनी आंदोलनात उत्साहाचे वातावरण निर्माण केले.

मुसळधार पावसातही नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवल्याने स्मार्ट मीटर आणि वीजबिलांचा प्रश्न आता व्यापक लोकभावनेचा विषय बनत असल्याचे चित्र दिसून आले. आंदोलनानंतर महावितरण या मागण्यांबाबत कोणती भूमिका घेते, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

दैनिक सिंहवाणी वृत्त
Epaper : epaper.sinhvani.com दिनांक : गुरूवार, २३ जुलै २०२६

थोडक्यात

## गायिका कस्तुरी पायगुडे यांचा 'तीर्थ विठ्ठल' २४ जुलै रोजी

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

आषाढी एकादशीच्या निमित्ताने सोहम सीनिअर सिटीझन होम व स्वरवेद प्रस्तुत 'तीर्थ विठ्ठल' हा पुण्याच्या सुप्रसिद्ध गायिका कस्तुरी पायगुडे याचा अभंगाचा कार्यक्रम शुक्रवार, २४ जुलै रोजी सायंकाळी ६ वाजता आयोजित करण्यात आला आहे. सोहम हॉल, सेवासदनच्या बाजुला, झाशी राणी चौक, नागपूर येथे होणाऱ्या या कार्यक्रमात कस्तुरी पायगुडे यांना अंबरीश जोगळेकर,प्रतिमा रोडी साथ देतील. तबल्यावर रवि सातफळे, सिंथेसायझरवर नचिकेत देव तर लघुवाद्यावर आदित्य पेशवे राहतील. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विशाखा पवार करणार आहेत. गायिका सुरमणी स्व. कुसूम चाफळे यांना समर्पित करण्यात आला आहे. रसिकांनी कार्यक्रमाचा आस्वाद घ्यावा, असे आवाहन स्वरवेद फाउंडेशनतर्फे करण्यात आले आहे.



## 'वृक्षवल्ली आम्हा सोयरे' आज

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

सोहम कलाविष्कार, नागपूर यांच्या वतीने आयोजित 'वृक्षवल्ली आम्हा सोयरे' हा संत रचनांवर आधारित सुश्राव्य कार्यक्रम गुरुवार, दि. २३ जुलै रोजी सायंकाळी ६ वाजता सायंटिफिक सोसायटी सभागृह, आठ रस्ता चौक, नागपूर येथे होणार आहे.

कार्यक्रमाचे संयोजन स्नेहल रानडे यांचे असून संकल्पना गजानन रानडे यांची आहे. कार्यक्रमात मंजिरी वैद्य अय्यर, मुकुल पांडे, निधी रानडे, अक्षय चारभाई, आकांक्षा चारभाई हे गायक कलाकार तर श्रीकांत पिसे, आर्य पुराणकर, वेद ढोक, आशिष गायधन, आदित्य गोगटे आणि सोहम रानडे या वादक कलाकार सहभागी होतील. कार्यक्रमाचे नृत्य संयोजन वृषाली साठे यांचे राहील. निवेदन स्मिता महान व देवव्रत देशपांडे यांचे राहील. या निःशुल्क कार्यक्रमाला विको लॅबोरेटरीज, एम. एम. असोसिएट्स व रोटरी क्लब ऑफ नागपूर पश्चिम यांचे सहकार्य लाभले आहे. या कार्यक्रमाचा आस्वाद घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## लॉयन्स क्लबतर्फे शालेय दप्तराचे वितरण

### मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजन



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

श्रीमती दादीबाई देशमुख हिंदू मुलींच्या शाळेत मा. मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त लॉयन्स क्लब तर्फे गरजू विद्यार्थिनींना शालेय दप्तराचे वितरण करण्यात आले. सुमारे दीडशे बॅगचे वितरण यावेळी करण्यात आले. शाळेचे पालक तसेच अँक्युप्रेशरचे संचालक पराग कुलकर्णी यांच्या पुढाकाराने हा कार्यक्रम घेण्यात आला होता. यावेळी लायन्स क्लब ऑफ ऑरेंज सिटी नागपूरचे अध्यक्ष विशाखा ईटकेलवार, बॅग वितरणचे प्रोजेक्ट डायरेक्टर पिंटू मोहाडीया, लॉयन्स क्लबचे पदाधिकारी प्रवीण पवार, परेश इटकेलवार, राजू नानोटकर, नितीन केदार, पुनम मेहाडिया, अरुणा सोलव तसेच शाळेचे उपामुख्याध्यापक मा. सुबोध आष्टीकर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन पल्लवी देशमुख यांनी केले.

## राज्याचे दिवंगत माजी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना जयंतीनिमित्त अभिवादन



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूर महानगरपालिकेतर्फे राज्याचे दिवंगत माजी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना जयंतीनिमित्त आज (ता.२२) विनम्र अभिवादन करण्यात आले. मनपा मुख्यालयातील महापौर कक्षा समोरील दालनात दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या प्रतिमेला महापौर निता ठाकरे यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस (अप) गट नेत्या आभा बिज्जू पांडे, अतिरिक्त आयुक्त अंकित, उपायुक्त मंगेश खवले, डॉ. मेघना वासनकर, जनसंपर्क अधिकारी मनीष सोनी, जनसंपर्क विभागाचे अमोल तपासे, प्रमोद हिवसे यांच्यासह मनपाचे इतर अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

## आरोपी रमेश म्हात्रेला व्हीआयपी ट्रीटमेंट

**वृत्तसंस्था, मुंबई**

शिवसेना शिंदे गटाचे नगरसेवक रमेश म्हात्रे यांच्यासह त्यांच्या सहकाऱ्यांनी डोंबिवलीच्या शासकीय रुग्णालयात डॉक्टरला मारहाण केल्याची घटना घडली होती. या प्रकरणी नगरसेवक रमेश म्हात्रे आणि इतर आरोपींना अटक करण्यात आली होती. या सर्वांना न्यायालयात हजर करण्यात आले. यावेळी रमेश म्हात्रेसह इतर सर्व आरोपींना ३ ऑगस्टपर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे. दरम्यान, अशातच रमेश म्हात्रे प्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाकडून ठाणे पोलिसांचीही खरडपट्टी करण्यात आली आहे. आरोपीला व्हीआयपी ट्रीटमेंट देण्यात आल्याची टिप्पणी मुंबई उच्च न्यायालयाने केली आहे.

# ऊर्जा क्षेत्रातील योगदानाबद्दल महावितरणचे अध्यक्ष लोकेश चंद्र यांचा गौरव

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नवीकरणीय ऊर्जेचा स्वीकार, ऊर्जा कार्यक्षमता आणि दीर्घकालीन ऊर्जा सुरक्षेसाठी वीज वितरण क्षेत्रातील उत्कृष्ट नेतृत्वाबद्दल मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव आणि महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांचा बुधवारी (दि. २२) विशेष गौरव करण्यात आला.

नवी दिल्ली येथे आयोजित 'टाइम्स नेटवर्क सस्टेनेबिलिटी कॉन्क्लेव्ह' (Times Network Sustainability Conclave) भारत 2035ः एक आत्मनिर्भर राष्ट्र या संकल्पनेवर आधारित या कॉन्क्लेव्हमध्ये २०३५ पर्यंत भारत हरित बांधिलकी आणि शाश्वत ऊर्जेच्या बळावर आत्मनिर्भर कसा बनू शकतो यावर विचारमंथन करण्यात आले. या परिषेदत ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला यांची विशेष मुलाखत घेण्यात आली.

महाराष्ट्राला स्वच्छ आणि हरित ऊर्जेकडे नेण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली विविध योजना व प्रकल्प राबवले जात आहेत. हरित ऊर्जा परिवर्तनातून सर्वांना स्वस्त व शाश्वत वीजपुरवठ्यासह वीज क्षेत्रातील आमुलाग्र सुधारणांना मुख्यमंत्री फडणवीस यांनी वेग दिला आहे. ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला यांनी ऊर्जा परिवर्तनासाठी रिसोर्स



अॅडेक्वेसी प्लॅन तयार केला आहे. तर या आराखड्याच्या अंमलबजावणीला मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव आणि महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी सक्रीय वेग दिला आहे.

महाराष्ट्राच्या वीज नियोजनात २०३० पर्यंत आणखी ४५ हजार मेगावॉट विजेची क्षमता वाढविण्याचे उद्दिष्ट आहे. त्यापैकी ३८ हजार मेगावॉट वीज ही हरित स्त्रोतांकडून मिळवून एकूण ऊर्जेतील नवीकरणीय ऊजेर्चा वाटा ५० टक्क्यांपेक्षा अधिक करण्याचे ध्येय आहे. त्यास अनुसरून महावितरणने स्वस्त व शाश्वत वीजपुरवठ्यासाठी अपारंपरिक ऊजेर्ला प्राधान्य देत आतापर्यंत केलेल्या एकूण वीज खरेदीच्या दीर्घकालीन करारांमध्ये तब्बल ६५ टक्के हरित ऊजेर्चा समावेश केला आहे.

यासोबतच सर्व शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा देण्यासाठी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० च्या माध्यमातून जगातील सर्वात मोठ्या विकेंद्रित सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्पांतून १६ हजार मेगावॉट क्षमतेचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. सध्या ५ हजार ५०० मेगावॉटपेक्षा अधिक क्षमतेचे प्रकल्प कार्यान्वित झाले असून त्याद्वारे राज्यातील १५ लाखांहून अधिक शेतकऱ्यांना सध्या दिवसा वीज पुरवठा मिळत आहे.

तसेच 'मागेल त्याला सौर कृषिपंप योजने'तून १० लाखांपेक्षा अधिक 'ऑफ-ग्रिड' सौर कृषी पंप कार्यान्वित करण्यात आले आहे. तर छतावरील सौर ऊर्जा प्रकल्पांद्वारे राज्यातील ९ लाखांहून अधिक कुटुंबांच्या वीजवापराचे बिल शून्य किंवा जवळपास मोफत झाले आहे.

## मन्नतपूर्ती गणेश सांस्कृतिक ट्रस्ट का भूमिपूजन संपन्न, ५१ वें वर्ष में साकार होगी श्री द्वारकाधीश जी की भव्य प्रतिकृति

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

आगामी गणेशोत्सव २०२६ के उपलक्ष्य में जूना गाड़ीखाना, तिलक रोड, महल स्थित भारत क्रीड़ा मंडल के अंतर्गत मन्नतपूर्ती गणेश सांस्कृतिक ट्रस्ट द्वारा बुधवार, २२ जुलाई को भव्य भूमिपूजन समारोह का आयोजन श्रद्धा एवं उत्साहपूर्ण वातावरण में संपन्न हुआ।



समारोह के मुख्य अतिथि श्रीमंत राजे मुधोजी भोसले के शुभहस्ते विधिवत भूमिपूजन संपन्न हुआ। इस अवसर पर मंडल के वरिष्ठ सदस्य मनोहर खुशलानी, भोजराज मोकाती, मधुसूदन बींजानी, अध्यक्ष राम, सचिव संजय लोया, अजय अग्रवाल, प्रवीण गुंड, विपिन शर्मा, पप्पन खुशलानी, कपिल अरोरा, आकाश इंगोले, संदेश खंगार, अमित शर्मा, शैलेश मोकाती, जयकिशन बींजानी, अमित शिंदे, महेश राठी, मनोज राठी, अजय पाठक, शुभम सोरते, सोनल लोया, चांदनी खुशलानी सहित अनेक गणमान्य नागरिक एवं मंडल के पदाधिकारी एवं सदस्य बड़ी संख्या में उपस्थित रहे।

उल्लेखनीय है कि भारत क्रीड़ा मंडल इस वर्ष अपने ५१वें वर्ष में प्रवेश कर रहा है। इस विशेष अवसर पर श्रद्धालुओं के दर्शनार्थ श्री द्वारकाधीश जी की भव्य एवं आकर्षक प्रतिकृति का निर्माण किया जाएगा, जो इस वर्ष के गणेशोत्सव का प्रमुख आकर्षण रहेगी।

मंडल ने सभी श्रद्धालुओं एवं नागरिकों से गणेशोत्सव के दौरान पधारकर भगवान श्री गणेश एवं श्री द्वारकाधीश जी के दिव्य स्वरूप के दर्शन करने तथा आयोजन को सफल बनाने में सहभागिता निभाने का आग्रह किया है।

## देवाभाऊ कृषी माऊली सन्मान सोहळा संपन्न

### महिला शेतकऱ्यांचा सन्मान; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

भारतीय जनता पार्टी महिला मोर्चाच्या वतीने माननीय मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त वंदे मातरम उद्यान, नागपूर येथे "देवा भाऊ कृषी माऊली सन्मान सोहळा" उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

या कार्यक्रमात शेतातील तसेच परसबागेतील भाजीपाला लागवड करून कुटुंबाच्या आर्थिक उन्नतीस हातभार लावणाऱ्या महिला शेतकऱ्यांचा सन्मान करण्यात आला. त्यांच्या कष्ट, जिद्द आणि कृषी क्षेत्रातील मोलाच्या योगदानाला मानवंदना देत महिला सक्षमीकरण, स्वावलंबन आणि हरित महाराष्ट्राच्या संकल्पाला



बळ देण्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

कार्यक्रमाचे उद्घाटन महापौर नीताताई ठाकरे यांच्या हस्ते झाले. यावेळी स्थायी समिती अध्यक्षा शिवानीताई दाणी, शहराध्यक्ष दयाशंकर तिवारी,पालक प्रगतीताई पाटील, शहराध्यक्षा दिव्याताई धुरडे, महामंत्री मनीषा अतकरे यांची प्रमुख उपस्थिती होती. ओम प्रकाश जादूदिया यांनी गार्डनिंग कसे करावे आणि आपलं आरोग्य कसे सांभाळावे याचे मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वंदना शर्मा यांनी केले. तसेच अनिता काशीकर, विशाखा जोशी, संपर्क मंत्री मोहिनी रामटेके आणि सहसंपर्क मंत्री स्वाती आखतकर यांनी कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विशेष योगदान दिले.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी महिला शेतकऱ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि त्यांच्या सक्षमीकरणासाठी शासनाच्या विविध योजनांची माहिती देत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महिला शेतकऱ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी घेतलेल्या निर्णयांचे कौतुक केले. तसेच त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांना हार्दिक शुभेच्छा देत जनकल्याणाची ही विकासयात्रा अशीच अखंड सुरू राहावी, अशी भावना व्यक्त करण्यात आली.

कार्यक्रमास महिला मोर्चाच्या पदाधिकाऱ्यांसह महिला शेतकरी, कार्यकर्त्या आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रम यशस्वी केला.

## जि.प सदस्य विमल बबलू कटरे ओबीसी महिला काँग्रेसच्या राष्ट्रीय कार्यकारणीत

**दै. सिंहवाणी वृत्त, सालेकसा**

महाराष्ट्राच्या अंतिम टोकावर अति दुर्गम आदिवासी भागात असलेल्या जि प सदस्य विमल कटरे यांना अखिल भारतीय राष्ट्रीय काँग्रेस ओबीसी महिला विभागच्या कार्यकारणीत प्रतिज्ञा सादर करण्याची संधी देण्यात आली. जनमाणसासाठी लढणारे व ओबीसीच्या लढा सामोर मिळून महापुरुषांच्या विचारांना घेऊन चालणारे आदिवासी भागातील समस्या दूर करण्यासाठी



रात्रंदिवस एक करणारे महाराष्ट्रातून फक्त दोन महिलांनाच राष्ट्रीय कार्यकारणीत निवड करण्यात आली आहे. या निवडीचे श्रेय विरोधी पक्षाचे नेते राहुल गांधी राष्ट्रीय अध्यक्ष, जय हिंद, राष्ट्रीय उपाध्यक्ष डॉ. भानुदास माळी, अध्यक्ष सपकाळ, नानाभाऊ पडोळे व अमर वराडे यांना देण्यात येतो. तालुक्यात त्यांच्या निवडीबद्दल आनंद व्यक्त करण्यात येत आहे.

# स्टडी टेबल, इलेक्ट्रॉनिक गॅजेट्स, गेम्सवर उड्या

### वापरात नसलेल्या वस्तूंना मिळाले नवे आयुष्य, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त 'अनोखा बाजार'चा उत्साहात शुभारंभ





**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

वॉचमनने आपल्या मुलासाठी सायकल घेतली, तर एका पित्याने हुशार मुलीसाठी स्टडी टेबल निवडले. गेम्स पाहताच एका चिमुकल्याने हट्ट धरला आणि वडिलांनाही तो मोडता आला नाही. कुणाच्या तरी घरात धूळ खात पडलेल्या या आणि अशा अनेक उपयोगी वस्तूंना 'अनोखा बाजार'मुळे नवे आयुष्य मिळाले. गरजूंना आवश्यक वस्तू विनामूल्य मिळाल्याने या उपक्रमाला पहिल्याच दिवशी उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

सोबत पालकत्व प्रकल्प, दि फ्रेण्ड्स को-ऑप. हाऊसिंग सोसायटी लि. यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच श्री सिद्धिविनायक सेवा ट्रस्ट आणि सोबत पालकत्व प्रकल्पाचे अध्यक्ष तथा माजी आमदार संदीप जोशी यांच्या प्रेरणेतून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित 'अनोखा बाजार' या आगळ्यावेगळ्या सामाजिक उपक्रमाचे उद्घाटन बुधवारी तात्या टोपे नगर येथील तात्या टोपे हॉलमध्ये उत्साहात झाले. दि फ्रेण्ड्स को-ऑप. हाऊसिंग सोसायटी लि.चे अध्यक्ष सुभाष मंडलेकर, सचिव डॉ. सुरेश तेलंग आणि संदीप जोशी यांच्या हस्ते फीत कापून बाजाराचे उद्घाटन करण्यात आले.

घरात वापरात नसलेल्या, मात्र चांगल्या स्थितीतील वस्तू गरजूंना उपलब्ध करून देणे, पुनर्वापराला चालना देणे आणि समाजात परस्पर सहकार्याची भावना वृद्धिंगत करणे हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश आहे. या बाजारात लहान मुलांची खेळणी, पुस्तके, स्वयंपाकघरातील साहित्य, क्रोकरी, कपडे, इलेक्ट्रॉनिक उपकरणे, खुर्च्या, डायनिंग टेबल, स्टडी टेबल, हँडबॅग, सायकली आदी दानदात्यांनी दिलेल्या विविध वस्तूंचे स्टॉल उभारण्यात आले होते.

सुभाष मंडलेकर यांनी या सामाजिक उपक्रमाला शुभेच्छा दिल्या, तर संदीप जोशी यांनी उपक्रमामागील संकल्पना आणि समाजोपयोगी उद्दिष्टे उपस्थितांसमोर मांडली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रणव घुगरे यांनी केले. सूत्रसंचालन ज्योत्स्ना कुऱ्हेकर यांनी केले, तर आभार संदीप मानकर यांनी मानले.

उपक्रमाच्या यशस्वितेसाठी मंजूषा जोशी, आनंद टोळ, प्रकाश रथकंठीवार, प्रणय मोहबंसी, गजानन निशितकर, कौशिक जोशी आणि वंदना शर्मा यांनी विशेष सहकार्य केले.

### दर महिन्याच्या शेवटच्या रविवारी भरणार 'अनोखा बाजार'

'अनोखा बाजार' हा उपक्रम दर महिन्याच्या शेवटच्या रविवारी सायंकाळी ५ ते ९ या वेळेत भरविण्यात येणार आहे. सहभागी होण्यासाठी सुरुवातीला १०० रुपये सेवा शुल्क भरून नोंदणी करावी लागेल. त्यानंतर प्रत्येक व्यक्तीला एका वेळी दोन वेगवेगळ्या वस्तू पूर्णपणे निःशुल्क घेता येतील. वापरण्यायोग्य स्थितीतील वस्तू दान करू इच्छिणाऱ्या नागरिकांनी पंचायतन अपार्टमेंट, प्लॉट क्र. १७६, फ्लॅट क्र. १०४, आरपीटीएस रोड, लक्ष्मीनगर, नागपूर येथे त्या जमा कराव्यात. वस्तू स्वीकारण्यासाठी दर रविवारी सकाळी ९ ते दुपारी १ या वेळेत कलेक्शन सेंटर सुरू राहणार आहे.

दैनिक सिंहवाणी वृत्त



# सावनेर व कळमेश्वर येथे भव्य शेतकरी कर्जमुक्ती मेळावा उत्साहात

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त आमदार डॉ आशिषराव देशमुख यांनी केले शेतकरी कर्जमुक्ती मेळाव्याचे आयोजन, पात्र लाभार्थ्यांच्या खात्यात ३० जुलैपूर्वी कर्जमाफीची रक्कम जमा होणार





**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त आमदार डॉ. आशिषराव देशमुख यांच्या पुढाकाराने सावनेर व कळमेश्वर येथे भव्य शेतकरी कर्जमुक्ती मेळावा उत्साहात संपन्न झाला. या उपक्रमाला दोन्ही तालुक्यांतील शेतकरी, नागरिक आणि लाभार्थ्यांनी हजारोंच्या संख्येने उपस्थिती लावली.

यावेळी आमदार डॉ. आशिषराव देशमुख यांनी सांगितले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबई येथील विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात पात्र शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमुक्ती देण्याची घोषणा केली होती. त्यानुसार राज्य शासनाने 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६' अंतर्गत शेतकऱ्यांच्या हिताचे महत्त्वपूर्ण निर्णय घेतले आहेत. ते म्हणाले की, या योजनेसाठी ३६ हजार ५८५ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून राज्यातील सुमारे ५६ लाख शेतकरी कुटुंबांना लाभ मिळणार आहे. पात्र शेतकऱ्यांचे दोन लाख रुपयांपर्यंतचे पीक कर्ज माफ करण्यात येणार असून १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत सहकारी, राष्ट्रीयीकृत, ग्रामीण व खासगी बँकांकडून घेतलेल्या पात्र पीक कर्जाचा समावेश करण्यात आला आहे. तसेच ३० सप्टेंबर २०२५ पर्यंतची थकबाकीही ग्राह्य धरण्यात येणार आहे.

आमदार डॉ. देशमुख यांनी पुढे सांगितले की, पूर्वीच्या अनेक जाचक अटी शिथिल करण्यात आल्या असून जमीनधारणेची कमाल मर्यादाही लागू राहणार नाही. पात्र लाभार्थ्यांच्या खात्यात ३० जुलैपूर्वी कर्जमाफीची रक्कम जमा करण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यात येणार आहे. शासनाच्या या ऐतिहासिक निर्णयाचा लाभ प्रत्येक पात्र शेतकऱ्यापर्यंत पोहोचावा, यासाठीच या मार्गदर्शन मेळाव्याचे आयोजन करण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले.

काही शेतकऱ्यांच्या आत्महत्या होतात. म्हूणन आमदार या नात्याने मुख्यमंत्री साहेबाना भेटून सरसकट कर्जमाफी द्यावी, अशी मागणी केली होती. आता फडणवीस साहेबांनी विनाअट २ लाखांपर्यंत कर्जमुक्ती केली. यामुळे नक्कीच आत्महत्या थांबविण्यास व शेतकऱ्यांच्या अडचणी दूर होण्यास मदत होईल. आणखी एक महत्वाचे म्हणजे वाढदिवसाच्या निमित्ताने सर्वत्र रक्तदान करण्यात करण्यात येत आहे, त्याचा देखील एक नवीन उच्चाक होईल. २०१४ पासून ही फडणवीस साहेबांनी केलेली दुसरी कर्जमाफी आहे. शेतकऱ्यांचे संपूर्ण जुने थकीत विजबिल माफ केले, आणि आता शेतकऱ्यांना मोफत विज मिळत आहे. PM किसान योजना द्वारे ६००० रुपये मिळतात आता मुख्यमंत्री फडणवीस सरकार सुद्धा ६००० रुपये देत आहे. लाडली बहीण योजनेद्वारे १५०० रुपये मिळत आहेत. आम्ही लवकरच २१०० रुपये करू. ग्रामीण भागात भेदभाव न करता ग्रामीण विकास झपाट्याने होत आहे. येणाऱ्या ४ वर्षात सावनेर-कळमेश्वर तालुक्यातील प्रत्येक शेतकऱ्यांच्या शेतापर्यंत पांदण रस्ता करून देऊ. लिंगा येथील कोलगॅसीफिकेशन च्या ७० हजार कोटीच्या प्रकल्पामुळे ३० हजार लोकांना रोजगार मिळणार. काही लोकांनी जिल्हा बँक बरबाद केली, त्यामुळे शेतकऱ्यांची खूप मोठी हानी झाली. पण त्याचादेखील हिशोब होणार आणि त्यांच्याकडून वसुली करून शेतकऱ्यांना त्यांचे पैसे सुरक्षित परत मिळणार, असे ते म्हणाले. नवनिर्वाचित विधान परिषद सदस्य डॉ राजीव पोतदार यांनी सुद्धा यावेळी मोलाचे मार्गदर्शन केले.

मेळाव्यात उपस्थित शेतकरी व नागरिकांनी राज्य शासनाच्या शेतकरी हिताच्या निर्णयांचे स्वागत करत आमदार डॉ. आशिषराव देशमुख यांनी घेतलेल्या पुढाकाराबद्दल समाधान व्यक्त केले. या प्रसंगी अशोक धोटे, मनोहर कुंभारे, रामराव मोवाडे, संजना मंगळे, पियुष बुरडे, एसडीओ, बीडीओ, तहसीलदार, बँक कर्मचारी उपस्थित होते.

थोडक्यात

## महावितरणतर्फे अजितदादा पवार यांना अभिवादन



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

महाराष्ट्राचे लोकप्रिय व खंदे नेते, कडक शिस्तीचे प्रशासक आणि राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त महावितरणतर्फे त्यांना नागपुरात अत्यंत आदराने आणि विनम्रभावे अभिवादन करण्यात आले. चोख प्रशासकीय हाकणी, स्पष्ट वक्तेपणा आणि कामातील वेळेची काटेकोर शिस्त यासाठी राज्यभर ओळखले जाणारे तसेच 'जे बोलतो ते करून दाखवतो' हा खाका बाणा असलेले अजितदादा पवार यांच्या प्रतिमेला अधीक्षक अभियंता संजय वाकडे यांनी पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहली.

महावितरणच्या काटोल रोडवरील विद्युत भवन या प्रशासकीय इमारतीत पार पडलेल्या या कार्यक्रमात, अधीक्षक अभियंता दिपाली माडेलवार व प्रफुल्ल लांडे, सहायक महाव्यवस्थापक (मानव संसाधन) महेश जाधव, वरिष्ठ व्यवस्थापक (वित्त व लेखा) सुधीर टेकाम, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी सचिन लहाने, उपमुख्य जनसंपर्क अधिकारी योगेश विटनकर यांच्यासह प्रादेशिक कार्यालय, नागपूर परिमंडल आणि नागपूर ग्रामीण मंडलातील अधिकारी, अभियंते व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी अजितदादांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

## आपली बसच्या खापरी आगारात महापौर निता ठाकरे यांच्या हस्ते ५७ रोपांचे वृक्षारोपण



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

महाराष्ट्राचे लोकप्रिय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून नागपूर महानगरपालिका परिवहन विभागाच्या वतीने पर्यावरण संवर्धन व 'हरित नागपूर' अभियानाला चालना देण्यासाठी एका विशेष वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. नागपूर महानगरपालिका परिवहन विभागाच्या खापरी आगार येथे पार पडलेल्या या कार्यक्रमात महापौर निता ठाकरे यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. परिसरात मान्यवरांच्या हस्ते ५७ वृक्षांचे रोपण करण्यात आले. याप्रसंगी मनपाच्या स्थायी समिती सभापती शिवानी दाणी वखरे, परिवहन समिती सभापती मंगला खेकरे, क्रीडा विशेष समिती सभापती दर्शनी धवड, परिवाहन प्रशासकीय अधिकारी योगेश लुंगे, कार्यकारी अभियंता पंकज पारशर, व्यवस्थापक ऑपेरेशन राजीव घाटोळे, गजानन नागूलवार, प्रवीण सरोदे, यांच्यासह डेपोचे अधिकारी व चलो मोबिलीटी चमूचे सदस्य प्रामुख्याने उपस्थित होते. पर्यावरण संरक्षण, शहरातील हरित क्षेत्रामध्ये वाढ करणे, तसेच स्वच्छ व प्रदूषणमुक्त नागपूर शहराच्या निर्मितीस हातभार लावण्यासाठी हा उपक्रम अत्यंत महत्त्वाचा ठरला आहे.

## एक झाड एक जीवन मिशन अंतर्गत आशिष राऊत, माजी उपसरपंच आणि शिवमित्र परिवार तर्फे रुक्षारोपण संपन्न

**दै. सिंहवाणी वृत्त, कोराडी**

आज सकाळी ११वाजता नवीन नांदा नर्मदेश्वर शिवालयच्या प्रांगणात आशिष मित्र मंडळ आणि शिवमित्र परिवार तर्फे भव्य



रुक्षारोपण कार्यक्रम संपन्न झाला. 'एक झाड एक जीवन' या कार्यक्रमाचा ब्रीद होता. पृथ्वीला हिरवेगार बनवून येणाऱ्या पिढीला प्रदूषण मुक्त करणे या उदात्त आणि पवित्र हेतूने आणि महाराष्ट्राचे लाडके मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचाही जन्मदिवस असल्याने या कार्यक्रम अतिशय वेगळ्या पद्धतीने साजरा होतो आहे याचे आम्हाला अभिमान आहे. संपूर्ण तरुणाई आशिष राऊत यांच्या मागे उभी आहे तसेच शिवमित्र परिवार हा देखील 'एक झाड एक जीवन' आणि छत्रपती शिवाजी महाराज, संभु राजे यांच्या विचारांना पुढे नेणारा ग्रुप आहे.

या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून लोणखैरी गावाचे सरपंच लिलाधर भोयर, अनुप गिरडकर, प्रसाद गिरडकर, प्रवीण महाजन, रुपेश महाजन, हेमराज चौधरी, माजी सरपंच बापू बिरखेडे, अक्षय महाजन, शुभम गावंडे, राहुल वैद्य, शुभम अंबिरे, आकाश बिछोरे, प्रफुल गावंडे, रवी राऊत, अमित उके, आयुष खैरे, समीर रंगारी, अभिषेक झाडे, नितेंद्र निनावे, मितेश लाहुट्रे, अमोल धानोले, कुणाल बारमांते, पराग खोपे, धीरज महाजन, विक्की बिटोले, विक्की ठुणे, सौरभ खंगारले, धृपमोहनकर, प्रशांत मेहुणे, ऋतिक दरव्हेकर, कुणाल बर्वे, सचिन राजपूत, रोहन मेश्राम या सर्वांनी कार्यक्रमासाठी खूप परिश्रम घेतले अल्पोहाराने कार्यक्रमाची सांगता झाली.

## महावितरणच्या विकासकामांना वेग द्या!

### नागपूर व वर्धा आढावा बैठकीत संचालक सचिन तालेवार यांचे निर्देश



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

महावितरणतर्फे नागपूर आणि वर्धा जिल्ह्यात युद्धपातळीवर सुरू असलेल्या पायाभूत सुविधांच्या विकासकामांमध्ये भौतिक आणि आर्थिक प्रगतीचा समतोल राखण्याचे कडक निर्देश महावितरणचे संचालक (प्रकल्प) सचिन तालेवार यांनी दिले आहेत. नागपूर परिमंडळातील विविध विकासकामांचा सविस्तर आढावा घेण्यासाठी आयोजित उच्चस्तरीय बैठकीत ते मार्गदर्शन करत होते.

विद्युत यंत्रणेच्या बळकटीकरणासाठी सुरू असलेल्या वाहिनी विलगीकरणाची कामे अधिक जलद गतीने पूर्ण करण्यासाठी कंत्राटदार एजन्सीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत नियमितपणे बैठका घेण्याचे आदेश त्यांनी दिले. तसेच प्रत्येक कामाचा सातत्यपूर्ण आणि काटेकोर पाठपुरावा ठेवावा, जेणेकरून निश्चित केलेल्या कालावधीत सर्व कामे सुरळीतपणे पूर्ण करता येतील. कामादरम्यान 'राईट ऑफ वे' किंवा अन्य काही तांत्रिक अडचणी निर्माण झाल्यास, त्यावर स्थानिक महसूल आणि पोलीस प्रशासनाशी तातडीने चर्चा करून समन्वय साधावा आणि त्यांच्या मदतीने त्यावर कायदेशीर व सुयोग्य तोडगा काढावा, असे निर्देश त्यांनी दिले. त्याचबरोबर, एजन्सीजच्या अडीअडचणी समजून घेऊन त्यांच्या कामात हवी ती मदत व सहकार्य करावे आणि त्याबाबतचे योग्य निर्णय तातडीने घ्यावेत, असे आवाहन त्यांनी महावितरणच्या अधिकाऱ्यांना केले.

नागपूर जिल्ह्यात आशिया विकास बँकेच्या अर्थसहाय्यातून पहिल्यांदाच इतक्या मोठ्या प्रमाणावर पायाभूत विकासाची कामे हाती घेण्यात आली आहेत. या महत्त्वाकांक्षी योजनेअंतर्गत ग्राहकांना अत्यंत विश्वासार्ह, अखंडित आणि दर्जेदार वीजपुरवठा उपलब्ध करून देणे हाच मुख्य उद्देश आहे. त्यासाठी नवीन 'रिंग मेन युनिट' उभारणीच्या कामांना सर्वाधिक प्राधान्य देण्यात आले आहे. ही सर्व कामे विहित मुदतीत आणि उच्च गुणवत्तेची असावीत, याकडे विशेष लक्ष देण्याचे निर्देश त्यांनी दिले. महावितरणच्या अभियंत्यांनी या प्रकल्पांमध्ये सक्रिय सहभाग नोंदवावा, असे सांगतानाच त्यांनी पायाभूत विकास विभागाला संचलन व सुव्यवस्था विभागातील कार्यकारी अभियंते आणि उपविभागीय अभियंते यांनी पूर्ण सहकार्य करावे, अशी सूचना केली. विशेष म्हणजे, यासाठी एडीबी योजनेच्या अंतर्गतच तशी विशेष तरतूद देखील करण्यात आली असून, सर्व विभागांनी परस्पर समन्वयाने काम करावे, असे स्पष्ट करण्यात आले.

आढावा बैठकीदरम्यान परिमंडळातील इतर प्रलंबित व सुरू असलेल्या योजनांचाही आढावा घेण्यात आला. नागपूर परिमंडळात वीज गळती प्रभावीपणे कमी करण्यासाठी हाती घेण्यात आलेल्या योजनेतील सर्व कामे यशस्वीरित्या पूर्ण झाल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले. तसेच, शेतीला दिवसा व भरवशाचा वीजपुरवठा उपलब्ध करून देणाऱ्या 'मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.०' मध्ये प्रस्तावित दोन्ही उपकेंद्रांची कामे याच चालु महिन्यात पूर्ण केली जातील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. याशिवाय, महावितरणच्या नवीन उपकेंद्रांसाठी आवश्यक असलेल्या जमिनीचा ताबा लवकरात लवकर मिळावा, यासाठी संबंधित शासकीय विभागांच्या अधिकाऱ्यांसोबत नियमित भेटी देऊन सातत्याने चर्चा करावी, असे निर्देशही त्यांनी दिले.

नागपूर येथील विद्युत भवन या प्रशासकीय कार्यालयाच्या सभागृहात पार पडलेल्या या बैठकीला महावितरणचे मुख्य अभियंता राजेश नाईक, अधीक्षक अभियंता (नागपूर प्रादेशिक विभाग) अमित परांजपे, अधीक्षक अभियंता (नागपूर ग्रामीण) संजय वाकडे, अधीक्षक अभियंता (नागपूर शहर) प्रफुल्ल लांडे, अधीक्षक अभियंता (पायाभूत आराखडा) दिपाली माडेलवार आणि नागपूर शहरातील सर्व कार्यकारी अभियंता प्रत्यक्ष उपस्थित होते. तसेच, वर्धा येथील अधीक्षक अभियंता स्मिता पारखी व तेथील संबंधित कार्यकारी अभियंता दूरदृश्यप्रणालीच्या माध्यमातून या उच्चस्तरीय बैठकीत सहभागी झाले होते.

## चाइल्ड हेल्पलाइन १०९८ च्या तत्परते मुळे दोन अल्पवयीन भावंडांना मिळाले नवे आयुष्य

### आई आणि बालकांची गळाभेट बघून अधिकारीही गहिवरले

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

चाइल्ड हेल्पलाइन १०९८ वर प्राप्त झालेल्या तक्रारीची तातडीने दखल घेत चाइल्ड हेल्पलाइन १०९८ आणि गिट्टीखदान पोलिस यांनी संयुक्त कारवाई करून प्रतिकूल परिस्थितीत राहत असलेल्या दोन अल्पवयीन भावंडांची सुटका केली. त्यानंतर दोन्ही बालकांना सुरक्षित आश्रयस्थानी दाखल करण्यात आले असून पुढील कार्यवाहीसाठी प्रकरण बाल कल्याण समितीकडे सादर करण्यात आले.

प्राथमिक चौकशीत संबंधित बालकांचे वडील निधन पावले असून आई मानसिक आजारामुळे त्यांना सोडून गेल्याने दोन्ही बालके पालकांच्या संरक्षण, संगोपन व आधारापासून वंचित राहिल्याचे समोर आले. उदरनिर्वाहासाठी त्यांना लहान वयातच काम करावे लागत असल्याचेही निदर्शनास आले. चौकशीदरम्यान मुलगा काम करत असताना त्याला विजेचा धक्का लागून तो सुमारे ३० टक्के भाजल्याची माहिती समोर आली. तसेच त्याच्यावर मारहाण होत असल्याची व आवश्यक वैद्यकीय उपचार पुरेशा प्रमाणात मिळत नसल्याची बाबही उघडकीस आली. मुलीकडून स्वच्छतेची कामे करून घेत ठरलेल्या मानधनापेक्षा कमी मोबदला दिला जात असल्याचेही प्राथमिक चौकशीत आढळून आले.

या सर्व बाबींचे गांभीर्य लक्षात घेऊन चाइल्ड हेल्पलाइन १०९८ आणि गिट्टीखदान पोलिस यांनी तातडीने संयुक्त कारवाई करत दोन्ही बालकांची सुटका करून त्यांना सुरक्षित आश्रयस्थानी दाखल केले. त्यानंतर बाल संरक्षण कक्षाच्या पथकाने संबंधित बालकांच्या आईचा शोध घेत दोन्ही बालकांची त्यांच्या आईशी भेट घालून दिली. बालकांचे सर्वोत्तम हित लक्षात घेऊन त्यांचे समुपदेशन करण्यात आले. बाल कल्याण समितीच्या अध्यक्षा छाया राऊत यांच्या मार्गदर्शनानुसार संबंधित महिलेचा शोध महिला बालगृह व इतर संभाव्य ठिकाणी घेण्यात आला. त्यानंतर आईचा शोध लागल्यानंतर दोन्ही बालकांची तिच्याशी भेट घालून देण्यात आली. पुढील संरक्षण व पुनर्वसनाबाबतची कार्यवाही बाल कल्याण समितीच्या मार्गदर्शनानुसार सुरू आहे.

सदर कारवाई जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी सुनील मेसरे तसेच गिट्टीखदान पोलीस स्टेशनच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक सौ. ललिता तोडासे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा बाल संरक्षण अधिकारी मुस्ताक पठाण, चाइल्ड हेल्पलाइन १०९८ चे प्रतिनिधी अनिकेत भिवगडे, मीनाक्षी धडाडे आणि मंगला टेंभूर्णे यांनी संयुक्तपणे पार पाडली.

जिल्हा महिला व बाल विकास विभागाने नागरिकांना आवाहन केले आहे की, बालमजुरी, बालकांवरील अत्याचार, दुर्लक्ष किंवा कोणतेही बालक असुरक्षित परिस्थितीत असल्याचे आढळल्यास तात्काळ चाइल्ड हेल्पलाइन १०९८ वर माहिती द्यावी. नागरिकांच्या सतर्कतेमुळे अनेक बालकांना वेळेत संरक्षण मिळून त्यांचे भविष्य सुरक्षित होण्यास मदत होऊ शकते.

## स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त सालेकसात हरित संदेश; जनसेवा सप्ताहात वृक्षारोपण



**दै. सिंहवाणी वृत्त, सालेकसा- राजु फुंडे**

महाराष्ट्राचे लोकनेते तथा लोकप्रिय उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त आयोजित "जनसेवा सप्ताह" अंतर्गत बुधवार, दिनांक २२ जुलै २०२६ रोजी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, तालुका सालेकसा यांच्या वतीने ग्रामीण रुग्णालय सालेकसा परिसरात वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

सकाळी ११.३० वाजता आयोजित या कार्यक्रमात ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. राजेश त्रिपाठी यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत समाजात हरित क्रांतीची जाणीव निर्माण करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. याप्रसंगी डॉ. लोणे मॅडम, डॉ. वाघमारे, डॉ. शांतनू उईके, लिपिक संतोष होळकर, कर्मचारी नितेश वाघाडे, तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राज्य सरचिटणीस (ओबीसी आघाडी) प्रभाकर दोनोडे, तालुका अध्यक्ष डॉ. अजय उमाटे, सालेकसा शहराध्यक्ष ब्रजभूषण बैस, जिल्हा महासचिव डॉ. हिरालाल साठवणे, वरिष्ठ सामाजिक कार्यकर्ते विनय शर्मा, विजय नागपुरे (तालुका प्रमुख, शिवसेना शिंदे गट), बिसराम चर्जे, अशोक गिरी गोस्वामी, तालुका युवक अध्यक्ष बाजीराव तरोने, महिला शहर अध्यक्षा सुनीता थेर, सुषमा राऊत, उषाताई वऱ्हाडे, अरुणा लिल्हारे, सौ. ममता बघेले, आरती उपाध्याय, सीता अवस्थी, कु. प्रियंका ब्राह्मणकर, राहुल साठवणे, जितेंद्र बडोले, बबलू मानकर, राहुल जंगेरे आणि रिषी बैस यांच्यासह अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी वृक्षारोपणासह वृक्षसंवर्धनाची सामूहिक जबाबदारी अधोरेखित केली. पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी प्रत्येकाने किमान एक तरी वृक्ष लावून त्याचे संगोपन करण्याचा संकल्प करावा, असे आवाहन करण्यात आले. कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

थोडक्यात

## घोगली (कोराडी रोड) महानुभाव आश्रम मेन रोडवरचा खड्डा कधी बुजवणार?

**घोगली वाशीयांचा ग्रामपंचायतला संतप्त सवाल**

**दै. सिंहवाणी वृत्त, कोराडी**

घोगली गाव आणि लेआऊटमधील नोकरदारवर्ग, विद्यार्थी, शेतकरी, दुधवाले याच मार्गाने नेहमी वाहतूक करीत असतात.



पावसाळा सुरू झालेला असल्याने अनेकदा सामाजिक कार्यकर्ता, वरिष्ठ नागरिक यांनी ग्रामपंचायत सचिवांना याबाबत विचारले असता उद्या करून देतो परवा करतो, अशी टोलवाटोलवी आणि पळवाट चालू आहे. प्रशासन ढिम्म झालेले आहे. गेंड्याची कातडी पाघरली की काय असा संतप्त सवाल नागरिक करीत आहेत. घोगली मुख्य रोडवर काही ठिकाणी खाच खळगे आहेत थिटे ग्रामपंचायत साधी डागडुजी करीत नाही. रोड अरुंद आहे, दोन चारचाकी वाहने समोरासमोर आल्यास साईट कटिंगला वेळ लागतो. विद्यार्थी शाळेत ज्यांनी या ठिकाणी खड्डा असल्याने आजूबाजूची माती डांबर रोडवर आल्याने चिखल झाला आहे त्यामुळे दुचाकी वाहने स्लिप होऊन अपघात होऊ शकतो. प्रशासनाने जागे व्हावे, अन्यथा नागरिक स्वतः पोलिस स्टेशनला जाऊन तक्रार करतील. नागरिकांचा ग्रामपंचायतने अंत बघू नये असा नागरिकांनी इशारा दिला आहे.

## वीज व गॅसअभावी खडकी अंगणवाडीची परवड, चिमुकल्यांच्या सुविधांकडे दुर्लक्ष

**स्थापनेपासून मूलभूत सुविधांचा अभाव; ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी**



**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**

नरखेड तालुक्यातील खडकी येथील अंगणवाडीची स्थापना सन २०२१-२२ मध्ये झाली असली, तरी आजतागायत या अंगणवाडीला वीजपुरवठा आणि गॅस कनेक्शन मिळालेले नसल्याने चिमुकल्यांच्या शिक्षणासह पोषण आहार व्यवस्थेवर गंभीर परिणाम होत आहे. शासनाकडून बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध योजना राबविल्या जात असताना प्रत्यक्षात मात्र मूलभूत सुविधांअभावी खडकी येथील अंगणवाडीची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे. गॅस कनेक्शन नसल्यामुळे पोषण आहार तयार करताना अंगणवाडी सेविकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असून अनेकदा पर्यायी व्यवस्था करून स्वयंपाक करावा लागतो. याचा परिणाम आहार वेळेवर तयार होण्यावर होत असल्याने बालकांच्या आरोग्याच्या दृष्टीनेही ही बाब चिंताजनक ठरत आहे. दुसरीकडे, विद्युत पुरवठा नसल्याने उन्हाळ्यात अंगणवाडीत प्रचंड उकाडा सहन करावा लागतो, तर पावसाळ्यात अंधारामुळे शैक्षणिक उपक्रम, खेळ, लेखन-वाचन तसेच इतर कृती प्रभावीपणे राबविणे शक्य होत नाही. पंखे, दिवे व इतर आवश्यक विद्युत उपकरणांचा वापर करता येत नसल्याने बालकांना अस्वस्थ वातावरणात वेळ घालवावा लागत आहे.

ग्रामस्थ आणि पालकांनी अनेकदा संबंधित विभागाकडे पाठपुरावा करूनही अद्याप ठोस कार्यवाही झालेली नसल्याची खंत व्यक्त केली. बालकांच्या भवितव्याशी संबंधित या प्रश्नाकडे शिक्षण व महिला व बालविकास विभागाने गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने वीजपुरवठा व गॅस कनेक्शन उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. याशिवाय अंगणवाडी परिसरात आवश्यक सुविधा, सुरक्षित परिसर, स्वच्छ पिण्याचे पाणी व इतर मूलभूत सोयी उपलब्ध करून देण्याचीही मागणी करण्यात आली आहे. शासनाच्या योजनांचा लाभ ग्रामीण भागातील चिमुकल्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचण्यासाठी प्रशासनाने तातडीने पावले उचलण्याची गरज व्यक्त होत आहे.

**प्रशासनाने प्रक्रिया सुरू केल्याचा दावा**

सरपंच सेवक माकोडे म्हणाले, अंगणवाडीसाठी गॅस कनेक्शन मिळविण्याचे प्रयत्न करण्यात आले होते. मात्र, कनेक्शन मंजूर न झाल्याने अंगणवाडीसाठी प्राप्त झालेली ५ हजार रुपयांची रक्कम अंगणवाडी सेविकांकडे परत करण्यात आली. गॅस कनेक्शन मंजूर झाल्यानंतर ही रक्कम पुन्हा वापरण्यात येईल. तसेच, वीज जोडणीसाठी आवश्यक सर्व प्रक्रिया पूर्ण करण्यात आली असून २१ जुलै २०२६ रोजी डिपॉझिट रक्कमही भरली आहे. त्यामुळे येत्या काही दिवसांत अंगणवाडीला वीजपुरवठा सुरू होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## उशीने तोंड दाबून प्रेयसीची हत्या

**ठाणे :** ठाण्यातील एका लॉजमध्ये प्रियकराने प्रेयसीची उशीने तोंड दाबून हत्या केल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी ठाणे नगर पोलिसांनी आरोपी प्रियकराला अटक केली असून त्याच्याविरोधात हत्येचा गुन्हा दाखल केला आहे. प्रेयसीचे इतर कोणासोबत तरी प्रेमसंबंध असल्याच्या संशयावरून खून केल्याची प्राथमिक माहिती समोर येत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, संध्या म्हस्के (वय २३, रा. भांडुप) आणि नंदकिशोर गाडेकर (वय २७, रा. विष्णूनगर, डोंबिवली) यांच्यात गेल्या चार वर्षांपासून प्रेमसंबंध होते. गुरुवारी ठाणे नगर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील महाराजा हॉटेल लॉज येथे हे दोघे आले होते. काही वेळानंतर दोघांमध्ये वाद झाला अन् आरोपी नंदकिशोरने उशीच्या साहाय्याने संध्याचे तोंड दाबले. श्वास गुदमरल्याने संध्याचा घटनास्थळीच मृत्यू झाला. यानंतर तो खोलीला बाहेरून कुलूप लावून निघून गेला. आरोपी एकटाच बाहेर पडल्याने लॉजच्या कर्मचाऱ्यांना संशय आला. त्यांनी खोलीत जाऊन पाहिले असता तरुणी निपचित पडलेली दिसून आली. कर्मचाऱ्यांनी तात्काळ ठाणे नगर पोलिसांना माहिती दिली.

# मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वामुळे महाराष्ट्र विकासाच्या नव्या उंचीवर

### विरोधकांनी विकासाच्या मुद्द्यावर बोलावे, कॉंग्रेसचे आंदोलन केवळ राजकीय नौटंकी, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांचे व्यक्तिमत्त्व आणि कार्य इतके व्यापक आहे की ते एका कागदावर किंवा हजारो लेखांमध्येही पूर्णपणे मांडता येणार नाही. त्यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र प्रगतीच्या आणि विकासाच्या नव्या उंचीवर पोहोचत असल्याचे महसूलमंत्री तथा नागपूरचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे सांगितले. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी बुधवारी नागपुरात प्रसारमाध्यमांशी संवाद साधला त्यावेळी बोलत होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त राज्यभर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, त्यांच्या रूपाने महाराष्ट्राला कर्तृत्ववान, दूरदृष्टी असलेले नेतृत्व लाभले आहे. नागपूरमध्ये माजी आमदार संदीप जोशी यांच्या पुढाकाराने आयोजित महायज्ञात मोठ्या संख्येने नागरिक सहभागी झाले असून, मुख्यमंत्री फडणवीस यांना दीर्घायुष्य लाभावे आणि महाराष्ट्राच्या समृद्धीसाठी त्यांना अधिक शक्ती मिळावी, अशी प्रार्थना करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. राज्याच्या कानाकोपऱ्यात मुख्यमंत्र्यांचा वाढदिवस उत्साहात साजरा होत असल्याचेही त्यांनी नमूद केले. यावेळी माजी उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या स्मृतींचाही उल्लेख करत बावनकुळे म्हणाले की, एकीकडे अजित पवार यांच्या जाण्याचे दुःख आहे, तर दुसरीकडे मुख्यमंत्र्यांचा वाढदिवस साजरा होत आहे. या दोन्ही भावना आज



राज्यात एकाच वेळी आहेत.

**शरद पवार-नरेंद्र मोदीजी भेटीवर प्रतिक्रिया**

राष्ट्रवादी कॉंग्रेसचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची घेतलेल्या भेटीबाबत विचारले असता बावनकुळे म्हणाले की, त्या भेटीचा नेमका विषय काय होता, हे कोणालाही माहीत नाही. मात्र विरोधी पक्षातील नेते आणि पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्यात भेटीगाठी होणे ही भारतीय लोकशाही आणि संस्कृतीचा भाग आहे. हीच महाराष्ट्राची संस्कृती आहे. त्यामुळे या भेटीकडे वेगळ्या नजरेने पाहण्याची गरज नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. शरद पवार हे ज्येष्ठ नेते असून त्यांनी पंतप्रधानांची भेट घेतली, त्यात काहीही गैर नसल्याचे त्यांनी सांगितले.

**पावसामुळे शेतकऱ्यांना दिलासा**

राज्यात एल निनोच्या प्रभावामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीचा उल्लेख करत बावनकुळे म्हणाले की, गेल्या काही दिवसांपासून झालेल्या चांगल्या पावसामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. त्यामुळे अनेक भागांतील पिके वाचली असून कृषी क्षेत्रासाठी ही समाधानाची बाब आहे.

**उद्धव ठाकरे-अरविंद केजरीवाल भेट**

उद्धव ठाकरे आणि अरविंद केजरीवाल यांच्या भेटीबाबत बोलताना बावनकुळे म्हणाले की, उद्धव ठाकरे यांनी आधी नगरसेवक सांभाळावेत. २०२९ च्या निवडणुकांना अजून वेळ असून सध्या विकासाच्या मुद्द्यावर राजकारण होणे आवश्यक आहे. जे स्वतःचे लोक सांभाळू शकत नाहीत, ते इतरांना काय एकत्र आणणार? हा प्रकार केवळ विनोद आहे. अरविंद केजरीवाल घरी गेले आणि उद्धव ठाकरेही घरी गेले आहेत, असा टोला त्यांनी लगावला.

**कॉंग्रेसच्या काळात २८ वेळा पेपरफुटीच्या घटना**

पेपरफुटीच्या मुद्द्यावरून कॉंग्रेस करत असलेल्या आंदोलनावर टीका करत बावनकुळे म्हणाले की, कॉंग्रेसच्या सत्ताकाळात तब्बल २८ वेळा पेपरफुटीच्या घटना घडल्या होत्या. त्यामुळे या विषयावर कॉंग्रेसला बोलण्याचा नैतिक अधिकार नाही. विद्यार्थ्यांना पेपरफुटीमुळे मानसिक त्रास होतो आणि ही अत्यंत गंभीर बाब असल्याचे त्यांनी मान्य केले. सरकारने या प्रकरणात योग्य वेळी हस्तक्षेप करून दोषींचा शोध घेतला असून, कोणतीही तक्रार येण्यापूर्वीच कारवाई केली असल्याचा दावा त्यांनी केला.

**कॉंग्रेसचे आंदोलन केवळ राजकीय नौटंकी**

एखादी घटना घडल्यानंतर त्याचे राजकारण करून समाजात वातावरण बिघडवणे योग्य नसल्याचे त्यांनी सांगितले. राहुल गांधी यांच्यावरही टीका करताना त्यांनी हे आंदोलन केवळ राजकीय नौटंकी असल्याचा आरोप केला. विद्यार्थ्यांनी आपल्या हक्कांसाठी आंदोलन करणे योग्य असले तरी त्यांच्या आंदोलनामागे राजकीय कटकारस्थान रचून त्याचा राजकीय फायदा घेण्याचा प्रयत्न होऊ नये, असेही बावनकुळे यांनी स्पष्ट केले.

## दिल्लीतील मेट्रो स्थानके अनिश्चित काळासाठी बंद

**नवी दिल्ली :** दिल्लीतील जंतरमंतरवर सुरू असलेल्या कॉक्रोच जनता पार्टीच्या तीव्र आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर सुरक्षेची खबरदारी म्हणून दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशनने बुधवारी सकाळी मोठा निर्णय घेतला. राजीव चौक, सेंट्रल सेक्रेटेरिएट, मंडी हाऊस, आयटीओ आणि खान मार्केट या प्रमुख स्थानकांसह एकूण १६ मेट्रो स्थानके पुढील आदेश येईपर्यंत प्रवाशांसाठी बंद ठेवण्यात आली आहेत.

कॉक्रोच जनता पार्टीच्या आंदोलनासाठी दिल्लीत हजारो आंदोलक जमा झाले असून सुरक्षेचा कोणताही प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी दिल्ली पोलीस आणि प्रशासनाच्या सूचनेनुसार १६ मेट्रो स्थानके बंद करण्यात आली आहेत. दरम्यान, या मेट्रो स्थानकांची एन्ट्री आणि एक्झिट गेट्स बंद असले तरी राजीव चौक, मंडी हाऊस आणि सेंट्रल सेक्रेटेरिएट या महत्त्वाच्या जंक्शनवर स्थानकांदरम्यान गाड्या बदलण्याची सुविधा सुरू राहील, अशी माहिती डीएमआरसीने दिली. मेट्रो सेवा विस्कळीत झाल्याने सकाळी कामावर निघणाऱ्या आणि प्रवास करणाऱ्या सामान्य नागरिकांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. प्रशासन परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून असून, सुरक्षा व्यवस्थेचा आढावा घेतल्यानंतरच ही स्थानके पुन्हा उघडण्याबाबत निर्णय घेतला जाईल.

## मुसळधार पावसामुळे वैष्णोदेवी, अमरनाथ यात्रा स्थगित



**वृत्तसंस्था, श्रीनगर**

जम्मू काश्मिर आणि उत्तराखंडमध्ये सध्या मुसळधार पाऊस पडत असून त्यामुळे अचानक येणारे पूर, ढगफुटी आणि पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. वैष्णो देवी मंदिर, अमरनाथ यात्रा आणि चारधाम यात्रेवर परिणाम झाला आहे. जम्मूतील वैष्णो देवी यात्रा आणि काश्मीरमधील अमरनाथ यात्रा मुसळधार पाऊस, अचानक आलेला पूर आणि ढगफुटीमुळे प्रभावित झाली आहे. त्यामुळेच सलग चौथ्या दिवशी या दोन्ही यात्रा स्थगित झाल्या आहेत.

जम्मू आणि कश्मिरमध्ये मुसळधार पावसामुळे सोमवारी वैष्णो देवीचे पवित्र तीर्थक्षेत्र असलेल्या अर्धकुमारी भवनकडे जाणाऱ्या नवीन मार्गावर मोठे भूस्खलन झाले. यामुळे, या मार्गावरील यात्रेकरूंची वाहतूक आणि बॅटरी कार सेवा स्थगित करण्यात आली. वैष्णो देवीच्या भाविकांना नेहमीच्या मार्गाने जाण्यास सांगण्यात आले आहे. तेथील शाळाही २६ जुलैपर्यंत बंद आहेत. माता वैष्णो देवी तीर्थक्षेत्र मंडळाचे कर्मचारी आणि मदत पथकांनी ढिगारे हटवण्याचे काम तीव्र केले आहे.

**अधिकृत माहितीवरच विश्वास ठेवा**

गेल्या तीन दिवसांपासून मुसळधार पावसामुळे जम्मू आणि कश्मिरमध्ये बहुतांश भागांमध्ये नद्या आणि ओढे दुथडी भरून वाहत आहेत. पावसामुळे डोडा, पूंछ आणि राजौरी येथे तेवीस जणांचा मृत्यू झाला आहे. जनतेला आणि भाविकांना सतर्क राहण्याचा आणि केवळ अधिकृत माहितीवरच विश्वास ठेवण्याचा सल्ला देण्यात आला आहे.

## मुख्यमंत्री फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त राज्यभर सेवा उपक्रम

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित विविध कार्यक्रमांसाठी नागपूर दौऱ्यावर आलेले भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांच्या नेतृत्वाचे कौतुक करताना राज्यभर राबविण्यात येणाऱ्या सेवा उपक्रमांची माहिती दिली. तसेच विरोधकांच्या आंदोलनावर टीका करत ही आंदोलने प्रायोजित (स्पॉन्सर) असल्याचा आरोपही केला. पत्रकारांच्या प्रश्नांवर उत्तर देताना चव्हाण म्हणाले की,



महाराष्ट्राला देशात अव्वल स्थानावर नेण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस दूरदृष्टी ठेवून काम करत आहेत. हे कार्य अधिक प्रभावीपणे करण्यासाठी धार्मिक अधिष्ठानही महत्त्वाचे असून, त्याच भावनेतून भाजपचे कार्यकर्ते राज्यभर विविध सेवा उपक्रम राबवत आहेत.

ते म्हणाले की, नागपुरात महायज्ञाचे आयोजन करण्यात आले असून राज्यातील प्रत्येक मंडळात सेवा यज्ञ होत आहेत. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिरे, वृक्षारोपण, आरोग्य शिबिरे तसेच विविध सामाजिक आणि जनहितार्थ उपक्रमांच्या माध्यमातून सेवा कार्य केले जात आहे. विरोधकांच्या आंदोलनांबाबत बोलताना चव्हाण म्हणाले की, ही आंदोलने प्रायोजित आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशात विकासाची गती वाढली असताना काहीजण आंदोलनांच्या माध्यमातून राजकीय अजेंडा पुढे रेटण्याचा प्रयत्न करत आहेत.

नीट प्रश्नपत्रिका फुटी प्रकरणात सात ते आठ जणांना

### विरोधकांचे आंदोलन प्रायोजित असल्याचा आरोप : रवींद्र चव्हाण

अटक करण्यात आली असून त्यांच्यावर कठोर कारवाई होणार असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच केंद्र आणि राज्य सरकारच्या प्रयत्नांमुळे नक्षलवाद मोठ्या प्रमाणात संपुष्टात आला असून, नक्षलवादाला पोषक असलेल्या संघटनांना परदेशातून होणारा निधीही थांबविण्यात आल्याचा दावा त्यांनी केला.सध्या सुरू असलेल्या आंदोलनांना परदेशातून निधी कोणाकडून मिळत आहे आणि ती आंदोलने नेमकी कोणी प्रायोजित केली आहेत, याबाबतची माहितीही लवकरच समोर येईल, असा दावाही रवींद्र चव्हाण यांनी यावेळी केला.

# दर्जेदार आरोग्य सेवांच्या दिशेने मनपाचे आणखी एक पाऊल

### झिंगाबाई टाकळी व जयताळा आरोग्य केंद्रांचे राष्ट्रीय गुणवत्ता मूल्यांकन सुरू, गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवांच्या दृष्टीने मनपाचा महत्त्वपूर्ण उपक्रम, डॉ. अंजना तिवारी व डॉ. प्रशांत एच. व्ही. यांच्या चमूकडून झिंगाबाई टाकळी केंद्राची तपासणी

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागांतर्गत मंगळवारी झोनमधील झिंगाबाई टाकळी नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र तसेच लक्ष्मीनगर झोनमधील जयताळा नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र यांच्या आरोग्य सुविधांचे राष्ट्रीय गुणवत्ता मूल्यांकन मानकांनुसार मूल्यांकन करण्यात येत आहे.

या अनुषंगाने केंद्र शासनाने गठित केलेल्या राष्ट्रीय मूल्यांकन समितीचे सदस्य डॉ. अंजना तिवारी आणि डॉ. प्रशांत एच. व्ही. यांनी झिंगाबाई टाकळी नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राचे मूल्यांकन सुरू केले आहे. त्यानंतर समितीतील अन्य सदस्य डॉ. मेहंदी हसन आणि डॉ. रवी चिंथाला हे दि. २४ व २५ जुलै रोजी लक्ष्मीनगर झोनमधील जयताळा नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राचे राष्ट्रीय गुणवत्ता मूल्यांकन मानकांनुसार परीक्षण करून मूल्यांकन करतील.



हा उपक्रम नागपूर महानगरपालिकेच्या महापौर निता ठाकरे यांच्या संकल्पनेतून राबविण्यात आला. उपमहापौर लिला हाथीबेड, स्थायी समिती सभापती शिवानी दाणी-वखरे, सत्तापक्ष नेते नरेंद्र (बाल्या) बोरकर, वैद्यकीय आरोग्य सभापती मनिषा अतकरे, आयुक्त डॉ. विपीन, अतिरिक्त आयुक्त अंकित यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. दीपक सेलोकर, अतिरिक्त वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. नरेंद्र बहिरवार, माता व बालसंगोपन अधिकारी डॉ. सरला लाड आणि साथरोग अधिकारी डॉ. गोवर्धन नवखरे यांच्या देखरेखीखाली या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.

बुधवारी (दि. २२) झिंगाबाई टाकळीनागरी प्राथमिक आरोग्य केंद्रात राष्ट्रीय मूल्यांकन समितीच्या सदस्यांचे नागपूर महानगरपालिकेतर्फे स्वागत करण्यात आले. यावेळी वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. दीपक सेलोकर, झोनल वैद्यकीय अधिकारी डॉ. अतिक खान, शहर गुणवत्ता समन्वयक डॉ. राजेश बुरे, झिंगाबाई टाकळी नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. नदीम खान,सार्वजनिक आरोग्य व्यवस्थापक डॉ. चैती हटवार तसेच संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

या मूल्यांकनामध्ये झिंगाबाई टाकळी नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रातील बाह्यरुग्ण सेवा (ओपीडी), लसीकरण, माता व बाल आरोग्य सेवा, प्रयोगशाळा, औषधालय, आरोग्य सल्ला सेवा, संसर्गजन्य व असंसर्गजन्य रोग व्यवस्थापन यासह एकूण १२ आरोग्य सेवांची राष्ट्रीय गुणवत्ता मानकांनुसार सखोल तपासणी करण्यात येणार आहे.

यावेळी वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. दीपक सेलोकर यांनी राष्ट्रीय मूल्यांकन समितीला नागपूर महानगरपालिकेच्या आरोग्य सेवांची माहिती दिली. त्यांनी सांगितले की, नागरिकांना दर्जेदार आणि गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी मनपा सातत्याने प्रयत्नशील आहे. मागील वर्षी कपील नगर नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राला राष्ट्रीय गुणवत्ता प्रमाणांकन प्राप्त झाले असून, मनपाच्या सर्व नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांनीही ही गुणवत्ता प्राप्त करावी, यासाठी प्रयत्न सुरू आहेत. मूल्यांकन प्रक्रियेदरम्यान सर्व वैद्यकीय अधिकारी, परिचारिका व कर्मचाऱ्यांनी समितीला आवश्यक ती माहिती अचूक व वेळेत उपलब्ध करून द्यावी तसेच मूल्यांकन प्रक्रियेस पूर्ण सहकार्य करावे, असे निर्देशही डॉ. दीपक सेलोकर यांनी दिले.

यावेळी राष्ट्रीय मूल्यांकन कर्ता डॉ. अंजना तिवारी आणि डॉ. प्रशांत एच. व्ही. यांनी उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांशी संवाद साधला. आरोग्य सुविधांची गुणवत्ता वस्तुनिष्ठपणे तपासणे हे समितीचे प्रमुख उद्दिष्ट असून, संपूर्ण मूल्यांकन प्रक्रिया पारदर्शक व विश्वासार्ह पद्धतीने पार पाडली जाईल, अशी ग्वाही डॉ. अंजना तिवारी यांनी दिली. तर डॉ. प्रशांत एच. व्ही. यांनी रुग्णसेवा हेच प्रत्येक नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राचे सर्वोच्च प्राधान्य असल्याचे सांगितले. मूल्यांकनाच्या संपूर्ण कालावधीतही रुग्णसेवेत कोणताही अडथळा निर्माण होणार नाही, याची विशेष काळजी घेत कार्यवाही करण्यात येईल, असे त्यांनी नमूद केले.

झिंगाबाई टाकळी नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये आयोजित छोटेखानी कार्यक्रमात दोन्ही राष्ट्रीय मूल्यांकनकर्तांचे मनपाद्वारे शाल, श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी झोनल वैद्यकीय अधिकारी डॉ. अतिक खान यांनी आरोग्य केंद्राच्या कार्याची सादरीकरणाद्वारे माहिती दिली व संचालन वैद्यकीय अधिकारी डॉ. नदीम खान यांनी केले.